REGISTERED No. N.

बाहेरगांवी टपालहांशीलसह ......
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ५० १
दर ओळीस..........८१ ८१
दुसरे खेपेस ........ .....८१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy .......................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 14 MARCH 1904 NO 10

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १४ माहे मार्च सन १९०४ इ० अंक १०

*Vide Resolution No. 1 of an adjourned Special Meeting Dated the 28th February 1904.*

## NOTICE

Notice Under Section 44 of the Berar Municipal Law:—

The Municipal Committee of Shegaon propose the imposition through out the area within the Shegaon Municipal limits of a tax on all buildings and lands under section 41 (1 (a) of the Berar Municipal Law in lieu of the present tax in force on buildings and lands imposed by Notification No. 72 dated the 1st. March 1899 of the Hyderabad Residency Orders as set forth below:—

1. A tax on all buildings and lands situated within the Municipal limits of the town of Shegaon not being the actual property of the Muncipality will be levied on and after the 1st day of April 1904 at the rate of rupees 7—8—0 per cent on their annual letting value.

Provided that the tax shall not be levied on buildings and lands the annual letting value of which does not exceed Rs. 6—0—0.

2 In calculating the amount of the tax fractions of a rupee exceeding eight annas to be taken as one rupee.

3. The tax to be payable in advance on April 1st of every year by the owners of the buildings and lands.

Any inhabitants of the Town of Shegaon objecting to the above proposal should submit his objection to the Committee in writing within 30 days from the publication of this notice.

Dated Shegaon the 29th February 1904. } V. G. Deshmukh Secretary M. Committee Shegaon.

## शिरकरयाणांची शासंचाध्यायविरील विस्तृत अर्वाचीन टीका

आजपर्यंत प्रसिद्ध न झालेला हा सुरस ग्रंथ जुन्या हस्तलिखित प्रतीवरून छापून काढण्याचा आमचा विचार आहे. ग्रंथ केव्हा सर्व प्रतिवेदन छापून तयार होईल. ग्रंथाची किंमत सारी १ रुपया आहे

ग्रंथ सुमारे साडेचार हजार असल्यामुळें १ रुपया म्हणजे अगदींच थोडी किंमत आहे टाईप साधारण मोठा व पक्के. वर्गणी पाठविणें ती रा० दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर आकोला याचेकडे पाठवावी. वर्गणीदारांची नांवें प्रसिद्ध केलीं जातील. पुस्तकाचें सर्व उत्पन्न दुसरे जुने ग्रंथ प्रसिद्ध करण्याकडे लावणार आहों. परमेश्वराची इच्छा असल्यास रक्कम हळूहळू वाढत जाऊन पुष्कळ जुने ग्रंथ बाहेर निघतील. असो. सध्याच अधिक लिहून उपयोग नाहीं.

आकोला २६।३।१९०४ } गणेश बळवंत मोडक बी. ए. संपादक.

## नोटीस

राजश्री रावजी रामजी टाळे कुणबी मुक्काम आरेगांव यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे आमचे कडेस गहाण तावरून असलेलें कर्ज व्याज व मुद्दल मिळून वसूल व्हावा जाणें एकूण रुपये ४२०० याची फेड करण्याकरितां तर्हि आमची खुद्द मालकीची जमीन कसबे डोणगांव येथील शेत सर्वे नंबर ३ ७, ३४८, ३६९, ३८२, ३८३,, ३८९ व २३२ यांतील अर्धा नंबर येणे प्रमाणें जमीन ९ वर्षां करितां वहितीस घेऊन वहिती सुरू झाल्याबरोबर गहाणखताची चुकती पावती देऊं असें कबूल करून ३ वर्षे पूर्वी जमीन तुम्ही वहितीस घेतली आहे. परंतु पावती आज देतों उद्यां देतों असें म्हणून पावती अजून पावेतों दिली नाहीं. तरी आतां ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत सदहूं रकमेची पावती देऊन आमचे पासून राहिलेले ६ वर्षांचें वहितीबद्दल कौलपट्टा लिहून द्यावा. असें न केल्यास चालूं सालीं जमीन तुमचे वहितीत न देतां आम्ही वहीत करूं व पुढें ज्या वेळेस पावती द्याल त्यावेळेस पुन्हां राहिलेले ६ वर्षांचें वहितीकरितां जमीन तुमच्या ताब्यांत देऊ तारीख ७ माहे मार्च सन १९०४ इसवी.

सही
रामगीर गुरू बाळागीरजी गोसावी संस्थान कसबे डोणगांव तालुके मेहेकर.

## नोटीस

ती. मातोश्री मगीमाई चांगो नाथ राहणार पिंपळगांव राजा इजला खालीं सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यात येते कीं माझा बाप चांगो व. लक्ष्मण नाथ याने याची पूर्वीची बायको नामे भागी (माझी जन्म देती आई) मेल्या कारणानें तुझ्याशीं पाट लाविला आणि माझा जन्म देता बाप पासून तुजला संतती दोन मुली नामे मेनी व दादू अशी असून त्या दोघी पैकीं सोनीचें लग्न माझा बापानेंच केलें व दुसरीचें लग्न करावयाचें आहे. माझे बापाची कमाईची इस्टेट म्हणजे कसबे पिंपळगांव राजा येथील घर आणि शेत सर्वे नंबर एकूण गुंठे आकार रुपये अशी इस्टेट आहे तरी इस्टेटीचा माझे बापाचे मागें मी मालक पूर्ण आहे. व त्याच मालकीचे आधारें माझे बापास जे कांहीं कर्ज असेल तें देण्याचा अधिकार मजला प्राप्त झाला आहे आणि तसेच तुझे पोटची मुलगी नामे दादू इचें लग्न करून देण्याचा व तुझे हयाती पर्यंत तुजला अन्नवस्त्र देण्याचा मजला अधिकार असून त्याप्रमाणें मजला देणें भाग आहे असें असतां माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं माझे मालकीची इस्टेट, शेत व घर माझे ताब्यात बापाचे मागें आली आहे ती तूं दुसरे कोणापाशीं गहाण अगर खरेदी करून देण्याचा अगर कर्ज काढण्याचा बेत केला आहेस तर तुजला या नोटिसीनें कळविले जातें कीं, तुझे हयाती पावेतों मी तुजला अन्नवस्त्र देईन. ही खबरी तूं दुसरे गंधर्व करी पावेतों आहे व तुझी मुलगी दादू माझी बहीण हीचें मी लग्न करून देईन व माझे बापानें हातचे जे कर्ज असेल ते मी देईन तुला अन्नवस्त्र शिवाय कांहीं मालकी नाहीं. आतां तूं जर लबाडीनें दुसरे सावकाराम अगर दुसरे मनुष्यास गहाण वगैरे खरेदी करून दिल्यास ती देण्याचा तुजला अधिकार नसल्यामुळें रद्द समजून जो व्यवहार तूं करशील तो केवळ मजला बुडविण्याचे हेतूनें केला असें समजून रद्द असे तुझे अन्नवस्त्र वी आणि मुलीचे लग्नासाठीं मजला दुसरे सावकाराचें कर्ज काढण्याची मुळीच जरूर नाहीं करितां तूं कोणास वरील इस्टेट गहाण अगर खरेदी करून देऊं नये व या नोटिशीचे अगदर तूं कांहीं व्यवहार केला असल्यास तो रद्द असे. ही नोटीस दिली सही. ता० ११-३-०४ इ०

सही
रामू वल्लद चांगो नाथ रहाणार पिंपळगांव राजा दस्तुर खुद्द.

## जाहिरात

या जाहिरातीनें सर्वत्र शेटसावकार व हकरतजी साहेब यांना कळविण्यांत येते कीं वरील इसम मजकूर यास दिलेली नोटीस वाचून पहावी व त्यांत लिहिले प्रमाणें तिचे कडून वरील नोटिशींतील स्थावर इस्टेट गहाण, खरेदी, ताबेगहाण, पट्टाखत वगैरे व कर्जरोखा वगैरे कांहीं देवघेवीचा व्यवहार या जाहिरातीचे तारखेपासून पुढें करूं नये व मागे झाला असल्यास तो बातल असे कळवें. ही जाहिरात दिली सही. ता० ११।३।०४ इ०

सही
रामू वल्लद चांगो नाथ दस्तुर खुद्द.

र. नं ११ क्लास २१ पैकी नंबर १/१९०४

जाहीरनामा

आक्ट नंबर ७ सन १८८९ अन्वये वारसाचे सरटीफिकीट देण्याबद्दल.

विद्वान किंग साहेब डिस्ट्रिक्ट जज्जसाहेब जिल्हा वाशीम यांचे कोर्टांत,

सर्वत्रास या जाहीरनाम्यानें कळविण्यांत येते कीं अब्दुल शेखगुलाब वल्लद शेख कदु मुळचा राहणार आजेगांव तालुके मंगरूळ पेर यांनें शेख हुसेन वल्लद रसिद मदार मुळचा राहणार आजेगांव हा तारीख १६-११-०३ इसवीचे सुमारास मयत झाला आहे व मौजे आसेगांव तालुके मंगरूळपीर येथें त्याची जिनगी या कोर्टाचे हद्दींत आहे. व ती जिनगी मिळण्या करितां मयताचा वारस मी आहे असें ठरवून सदर्हू आक्टा प्रमाणें वारसाचे सरटिफिकीट मिळावें म्हणून या कोर्टांत अर्ज दाखल केला आहे. करितां या प्रकर्णांत ज्याचा हक्क संबंध असेल त्यानीं तारीख १६ माहे एप्रील सन १९०४ इसवी रोजीं सकाळी १० वाजतां आमचे समोर हजर राहावें व आपले हक्क संबंध दाखवावेत. असे करण्यात चुकूं नये. कळावें तारीख ८।३।१९०४ इसवी.

S. H. King
सिव्हिल ज्यज्य वाशीम.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १३ शके १८२५

## नवा श्रीग

### (स्त्रीशिक्षणाचा)

असी पूर्वीच म्हटलें आहे कीं आमचा स्त्रीवर्ग सुशिक्षित नाहीं असा गैरसमज कोणी करून घेऊं नये. तो कदाचित पुस्तकी विद्येनें संपन्न नसेल पण तो निःसंदेह हिंदुसमाजाला फार उपकारी व शोभविणारा असा गुणसंपन्न होता. हिंदुसमाजाची कल्पना पाश्चिमात्य दृष्टीनें बरोबर येणार नाहीं म्हणुन आम्ही आमचा स्त्रीवर्ग सुशिक्षित व सुसंस्कृत असल्या विषयीं प्रतिपादन केलें आहे. इतर आगंतुक कारणामुळें स्त्रीजन मागें पडला, किंवा पाश्चात्य विद्याचा पूर येथील भूमिवरून जाऊं लागला तेव्हां आमचा स्त्रीवर्ग सा‍ई‍कारणानें मागें सरला तरी तो आनुवंशिक सुशिक्षितपणा अजून लयास गेला नाहीं. नवीन काळाला अनुरूप असा कार्यक्षमपणा त्यांच्या अंगीं येण्यासारखा त्यांचा शिक्षणक्रम पाहिजे. हल्लीं समाजामध्यें स्त्री म्हणजे विद्यासर्वस्व होऊन बसली आहे. स्त्री देण्यारी विद्या पुरुषाला पाहिजे तशी स्त्रीला देखील पाहिजे. परंतु

श्री सा ठींव सर्व आयुष्य खर्ची घालण्याचा तो विपर्यास अ झाला नको. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हीं साध्य करून देण्याला श्री हें अगदीं बाह्य साधन आहे. पूर्वींचीं मा-नसिक साधनें आह्माला वर्जितच ठेवावयाचीं आहेत स्त्री शिक्षण जन्मपोषित पाहिजे; तें उन्नतम पाहिजे आणि मन प्रकाश व विकासित करणारें पाहिजे. मराठीत्राप अभ्यास अनुक्रमर पुढून उंल इसका आहे. आपला मराठी भाषा व मराठी इंग्रजी... इंग्रजी शिक्षा आपणांस नको अशी आमची इच्छा आहे. देशी विद्यापाडार विर्याच्या साठी कौटुंबिक कार्याला अधिक सत्र करील. सर्व कला शिकवाव्या पण त्या तुमच्या इंग्रजी भाषा अन्तर शिकविण्याचा वृथा फटाटोप नको आहे. इंग्रजी विद्या शिकणें वाईट आहे असें नाहीं पण तें शिक्षण घेणाऱ्या उद्धाम कार्य कर्तृत्वात आडवें पडत आहे तितकें दूर केलें पाहिजे.

---

## जपान फंड

( जपानाला वर्गणीची मदत )

बंगाल इलाख्यानें एक उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे; तें सर्वथैव अनुकरणीय आहे. बंगाल्याचा कित्ता आपण गिरविला पाहिजे. ही वर्गणी गोळा करण्याचा उद्देश असा कीं रुसो-व जपान लढाईंत जे जपानी लोक घायाळ व जायबंद झाले आहेत त्यांस औषधोपचाराची व शुश्रूषेची योग्य मदत मिळावी ह्मणून ही वर्गणी जपान देशाला पाठवावयाची आहे. बंगाल्यांत नाटोरचे श्रीमंत महाराज यांच्या अध्यक्षते खालीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे, आणि ही मंडळी 'जपान फंड' गोळा करीत आहेत. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या अध्यक्षतेखालीं 'रिपन कालेजा' च्या विद्यार्थ्यांनीं असाच एक फंड उभारलेला आहे. हा उपक्रम इतरत्र देखील अवश्य चालूं झाला पाहिजे. एक एक रुपया वर्गणी गोळा केली तरी त्याची रक्कम मोठी जमण्यासारखी आहे.

या फंडाची महती फार आहे. या गोष्टी-चा राजकीय प्रकरणांशी कांहींच संबंध नाहीं. धारातीर्थी जे घायाळ होतात त्यांस द्रव्यद्वारा मदत करणें हें महा पुण्य होय. हिंदुस्थानांत हा धर्मादाय उत्तम कोटींतला गणलेला आहे. त्या शिवाय जपानाशी आपला संबंध अगदीं बंधुप्रेमाचा आहे. सध्यां आशिया खंडांत युरोपियन राष्ट्रांनीं जी पादाक्रांती चालविली आहे तिचा प्रतिकार करणारें असें हें आशियांतील राष्ट्र आहे. हें पौर्वात्य राष्ट्र आह्मांस आमचें आहे असें वाटतें. हा अंतर्गत कळकळ्यानें जपानाचा इंडियांशी एकजीव झालेला आहे. जपान हें एकटेंच स्वतंत्र, बलाढ्य व नांव घेण्यासारखें राष्ट्र उरलेलें आहे. जपानानेंच चांगली टक्कर दिली आहे. त्या शिवाय जपानाची लढाई सन्मार्गाची आहे. रशियाची राज्यतृष्णा कमी करण्यासाठीं, स्वातंत्र्यासाठीं व सत्पक्षासाठीं ही जपानची लढाई आहे. माञ्चुरिआंत रशिया घालेला आहे आणि तो कोरिआ घेऊं पहात आहे. तेव्हां अशा आगळीक करणाऱ्या राष्ट्राची पिच्छेहाट करणारें जपान कोणाला नावडणार नाहीं बरें! त्या शिवाय जपानचें राष्ट्र ब्रिटिश राष्ट्राच्या दोस्ता पैकीं प्रमुख आहे आणि ह्मणूनच या बाजूनें आपल्या वर्गणीला प्रत्यवाय येण्यासारखा नाहीं. याही वेळां जपानाचा हक्क इंडियावर विशेष आहे. जपानानें इंडियन विद्यार्थी वर्गावर मोठे उपकार केले आहेत. इंडियनाला जपानी लोक आदरसत्कारानें वागवितात. गेल्या मोठ्या दुष्काळांत जपानानें २५ हजार रुपये वर्गणी पाठविली होती. जपानी धर्म ह्मणजे बौद्ध धर्म. हा धर्मही आमच्या देशांतूनच तिकडे गेलेला आहे. अशा नाना गोष्टी जपान व इंडिया या दोन राष्ट्रांचीं अंतर्मने एकत्र करितात; आणि आमच्या अहेतुक प्रेमभावाला देखील हींच कारणें असावींत.

## स्थानिक संकल्प

जपान फंडाची उभारणी आकोल्यांतही करण्यांत येत आहे. तत्संबंधी वर्गणी गोळा करण्याचा आह्मी संकल्प केला आहे. ही वर्गणी देणाऱ्यांची यादी आह्मी निराळीच छापणार आहों. सध्यां आह्मी इतकेंच कळवितों कीं ज्यांस या अत्युत्तम पुण्य कार्याकडे वर्गणी देण्याची बुद्धी होईल त्यांनीं आपली रक्कम आह्माकडे रवाना करावी ह्मणजे आह्मी पुढील व्यवस्था त्यांच्या इच्छेला अनुरूप जशी होईल तशी मागाहून प्रसिद्ध करूं. वर्गणी एक रुपयाहून कमी नसावी एवढीच काय ती अट ठेवलेली आहे.

---

## मेळा

डेक्कन कालेजाचा वाढदिवस येत्या २३ वे तारखेला आहे. या दिवसा निमित्त त्या कालेजांत शिकलेल्या गृहस्थांची एक सभा भरविण्याचा संप्रदाय रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं गुदस्ता पासून येथें घालून दिलेला आहे. यंदा ते त्या दिवशीं डेक्कन कालेजा-लाच मुद्दाम जाणार आहेत तेव्हां ते येथें असणार नाहींत तथापि त्यांच्या त्या मूळ हेतूला अनुसरून येथील त्या पाठशाळेंतील गृहस्थांनीं ही सभा यंदा पुनः भरविण्याचा विचार केला आहे. त्या कालेजाचे पुष्कळसे माजी–विद्यार्थी आमच्या प्रांतांत आहेत तेव्हां ते येत्य २३ वे तारखेला अवश्य आकोल्यास येण्याची मेहेरबानी करितील अशी आह्मांस उमेद आहे. या संबंधानें पत्रव्यवहार रा० रा० केशव गोविंद दामले वकील यांच्याशी करावा ह्मणजे सविस्तर प्रोग्रामाची माहिती मिळेल.

---

## अभिनंदन

( राजश्री बाळ गंगाधर टिळक यांची निर्दोषता )

आह्मी मोठ्या मनोभावानें व आल्हादानें राजश्री टिळक यांचें अभिनंदन करितों. शेवटीं त्यांच्या वरील खोट्या जबानीचा फौजदारी खटला अगदीं निराधार ठरला व त्या सत्यप्रतिज्ञ पुरुषाची वाणी खरीखरी झाली. त्यांची निर्दोषता हायकोर्टानें प्रस्थापित केली आहे आणि ह्मणून महाराष्ट्रच काय पण सर्व हिंदुस्थान देश त्यांच्या बाबनकशी चरित्राबद्दल त्यांना धन्यवाद गात आहे.

हे आनंदोद्गार हृदयाबाहेर पडत आहेत तोंच दुसरा विचार मनांत येतो कीं कोण हा छळ! न्यायाच्या दरबारांत जाण्याचा प्रसंग परमेश्वर कोणावरही न आणो! नामदार आस्टन व न्यायमूर्ती क्लेमेंट यांच्या पुढील कार्यश्रेणी ह्मणजे अपमान, धिःकार व न्यायाचें वैषम्य यांचा उफराटा दुर्विपाकच होय! दीड अडीच वर्षें चालणारा फौजदारी खटला, पन्नास पाऊणशें हजार रुपये खर्चणाऱ्या सरकाराचा पाठिंबा, व रा० टिळका सारखा हिंमतबहादर, सत्यशील व कायदे-पंडित आरोपी या गोष्टी देखील अद्भुतच होत. पण ईश्वर कृपेनें सर्व अरिष्टाचे ढग वितळले आणि सर्वत्र आनंदी आनंद झाला.

## तात्पर्य

या एकंदर प्रकरणावरून चार बोधाच्या गोष्टी अवश्य घेण्यासारख्या आहेत. मुंबई सरकारा सारख्या मोठ्या सरकारानें व्यक्ति-विषयक प्रश्न स्वतां हातीं घेऊं नयेत. सरकारी पैशाचा अपव्यय होतो, पाताळयंत्री अधिकारी आपल्या दुष्ट मनोविकारांचें साम्राज्य स्थापितात आणि रा० टिळका सारख्या लोकाग्रणीचा वृथा छळ होतो. कै० ताई महाराजांचा ग्रंथ आटोपला आहे. तथापि कारस्थानी, लोभी व दांभिक लोक स्त्रियांचा खेळ कसा चालवितात, गृहामध्यें कलहाग्नि कसा भडकतो आणि नानाविध आप्तमित्र कसे संकटांत येतात याचें उत्कृष्ट उदाहरण ह्मणजे हा खटला होय. थोर पुरुषांचा आपत्कालही मोठा बोधप्रद असतो. रा० टिळकांवरील खटल्यामुळें थोड्या वर्षां पूर्वी राजद्रोहाचा कायदा बदलावा लागला. या खटल्यांत वऱ्हाडप्रांत ब्रिटिश मुलूख नाहीं असें निष्पन्न झालें आणि खोट्या जबानी संबंधाच्या पिनलकोडाच्या कलमाचा अर्थ विशद करून सांगण्यांत आला. राजश्री लुकस सारखे सद्गृहस्थ देखील विचार-समुद्रांत फार बोटाळले ते इतके कीं त्यांनीं इंडियन साक्षीदारा संबंधानें भलतेच सामान्य सिद्धान्त ठोकून आपल्या तरल मतीची लघुता दर्शविली. इंडियन काय आणि युरोपिअन काय, कोण केव्हां स्वकार्यासाठीं खोटें बोलेल किंवा खरें बोलणार नाहीं हें निश्चयानें कोणासच सांगतां येणार नाहीं. पण राजश्री लूकस यांनीं साक्षीदारांच्या जबान्यांचा समुद्र मंथन करितांना आपली विचारपद्धती इतकी दूषित होऊं दिली कीं शेवटीं निर्फळ असे सिद्धान्त-रूपी शंख बाहेर पडले. राजश्री गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांच्या सारख्यांवर ते फार घसरले होते आणि त्यांनीं लेखणीला इतस्ततः सैर फिरविली ही मोठी चूक होय. सर्व साक्षीदार बनावटी, असत्यवादी व त्याज्य असा ग्रह करून चालणाऱ्या चांगल्या देखील न्यायाधीशाचें डोकें त्याला कोणत्या विचारलहरींत नेऊन सोडील याचा नेमच रहात नाहीं. सत्यासत्याची निवड करितांना न्यायाधीशांनीं घ्यावयाच्या खबरदारी या प्रकरणापासून शिकण्यासारख्या आहेत. टाइम्सकारांनीं न्यायमूर्ती लूकस यांची फार धन्यता वर्णिली होती; आणि त्यांस सत्यासत्यतेची निवड उत्कृष्ट साधली आहे असें प्रतिपादन केलें होतें. आह्मी तर असें ह्मणतों कीं राजश्री लूकस यांची दृष्टी न्यायाकडे होती तथापि त्यांच्या दृष्टींत पुष्कळच दोष होते आणि त्यामुळेंच त्यांचा तो निकाल कायद्याच्या मूल तत्वांस सोडून होता व पुराव्याच्या बाजूनें देखील अगदीं चुकीचा होता हें मुंबईच्या हायकोर्टानें सर्व जगास विदित केलें आहे.

## खर्च

राजश्री टिळक यांस या फौजदारी निमित्त कमीत कमी २५ हजार रुपये खर्च आला असावा. २ हजार रुपये नकला निमित्त खर्च झालेला आहे. हा खर्च त्यांनीं कोठून केला असावा हा प्रश्न सरकारानें आपणापुढें मांडावा आणि त्यांच्याच कृतीनें झालेली ही नुकसानी भरून काढण्यासाठीं राजश्री टिळक यांस थोडासा राजाश्रय द्यावा असें आह्मी आग्रहपूर्वक सूचवितों. अशा कृतीनें सरकारावरील मोठासा दोष अंशतः दूर होईल अशी आमची समजूत आहे. एवढा पैसा खर्च झाला तरी तो इतर नुकसानी संबंधानें फार स्वल्प आहे. राजश्री टिळक ह्मणजे एक धैर्याचा पर्वतच असला पाहिजे. त्यांच्या शरीराला, मनाला व बुद्धीला देखील या फौजदारीमुळें पुष्कळच झीज लागलेली आहे. यांच्या हातून उत्तम ग्रंथ निर्माण होऊन सर्व राष्ट्रावर उपकार होतील असा हा त्यांचा प्रस्तुतचा परिणत काल आहे. अनुभव, दीर्घ विद्याव्यासंग, कुशाग्रबुद्धि, इत्यादिकांचीं अमृतफळें लोकांपुढें मांडण्याचा हा त्यांच्या आयुष्यांतील उत्तम काल आहे. आणि तो सरकारी अरिष्टामुळें अशा प्रकारें व्यर्थ दवडला गेला हें आमच्या राष्ट्राचें मोठें नुकसानच होय. राजश्री टिळक यांस दीर्घायु व सुखसमृद्धि चिंतून आह्मी त्यांच्या भावी लोक-कल्याणाच्या गोष्टीकडे विशेष आतुरतेनें लक्ष्य देऊन आहों.

---

## पैसा फंड

पैसा फंड ह्मणून एक संस्था आहे. तिला एक पैसा वर्गणी दिली तरी चालते. वर्गणीचा अत्यल्प अंश ह्मणजे एक पैसा ठरलेला आहे. हा फंड महाराष्ट्रांत विशेष प्रचलित आहे. या संस्थेचे उपदेशक रा. रा. अनंत दामोदर काळे हे हल्लीं वऱ्हाडांत फिरत आहेत आणि ते नाना ठिकाणीं या पैसा फंडाच्या शाखा व उपशाखा स्थापित करीत आहेत. तसा योग गेल्या गुरुवारीं आकोल्यासही आला व जाहिरसभा भरविण्यांत आली. ही संस्था स्थापण्याचा मूळ उद्देश फार स्तुत्य आहे. राजश्री काळे यांनीं आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं आपल्या देशांतील उद्योग व कलाकौशल्य हीं अगदीं ठार बुडालीं आहेत. त्यांचें पुनर्जीवन करण्याला पैसा फंडाची संस्था अगदा सुलभ उपाय आहे. पैसा कोणीही देऊं शकतो. अशा रितीनें देखील मोठा फंड उभा होतो. या फंडाचा मुख्य विनियोग असा करावयाचा आहे कीं जपानाला नेटीव विद्यार्थी कलाकौशल्य शिकविण्यास धाडावे, त्यांच्या कलाज्ञानाचा लाभ घेण्यासाठीं देशी कारखाने काढावे आणि अशा नानारितींनीं देशी कलाकौशल्याचा उत्कर्ष करण्यांत यावा. राजश्री अनंतराव काळे या

कि. दि. ह्मा. नंबर ११ मि. नंबर. १
१९०४

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटिफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यातील कलम ७ अन्वये नोटीस.

वि० गोपळ वामन बापट साहेब बहादूर सिव्हील जड्ज्य आकोले याचे कोर्टांत.

अर्जदारीण-चनाबाई भ्रर्द रावजी कुणबी राहणार दहिगांव तालुके आकोट.

सर्वत्र लोकांस.

या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं वरील अर्जदारीण हिनें मयत रावजी वा. सखाराम याचे कर्ज वसूल करण्याकरितां सरटिफिकीट मिळावें ह्मणून आमचेकडेस तारीख ६।२।०४ इसवी रोजीं अर्ज दिला असून त्याचें चौकशीची तारीख २६।३।१९०४ इसवीची नेमिली आहे. तरी ते दिवशीं अर्जदारीण इजला सरटीफिकीट कां देऊं नये याचे कारण दाखविण्यास तुह्मी आपले दस्तैवज वगैरे पुराव्यासह आमचे समक्ष सदर्हू तारखेस १० वाजतां हजर व्हावें. आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानीशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख ४ माहे मार्च सन १९०४ इ.

[G. W. Bapat
सिव्हिल ज्यडज्य आकोला.

## नोटीस

नोटीस घेणाऱ्या भगवनजी गुजराथी ब्राह्मण राहणार धार हल्ली वस्ती बाळापूर यास खाली सही करणार यामकडून नोटीस करण्यांत येते कीं तुह्मी आमचे पक्षकार बुकेश्वर केशवराम गुजराथी यांस तारीख २२।१।०४ ची नोटीस बाळापुर येथील गुजराथी लोकांचे जातीचें उपाध्यपणाचे हक्काचे हायाबद्दल ती पोंहचली सदर्हू गुजराथी लोकाचे जातीतील उपाध्यपणाचें वतन हे मयत गंगाबाई जवजे देवरामभट यास कायदेशीर रितीनें बक्षीस देण्याचा मुळींच अधिकार नाहीं सबब त्या वृत्तीवर तुमचा कोणतेही प्रकारे हक्क पोहचत नसून त्या संबंधीं उत्पन्न मागण्याचा हक्क नाहीं.

सही
रामचंद्र मार्तंड गुप्ते वकील
राहणार आकोला.

## नोटीस

नेहमी बळीराम वल्लद आत्माराम तायडे राहणार कोलखेड जहांगीर परगणे कुरणखेड तालुका आकोला यांस

या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्माजवळ असलेल्या ९०० रुपयांच्या गहाणाचा चुकता निकाल व्याजासुद्धा तारीख १६।१।०४ रोजीं आकोलें मुक्कामीं केला.

तुह्मी आमचा गहाणपत्र अजून परत केला नाहीं तो ही नोटीस पोंचतांच आठ दिवसांच्या आंत आमच्या हवालीं करावा. असें करण्यास चुकाल तर कोर्टमार्फत सर्व खर्चासुद्धां गहाणपत्र परत घेतला जाईल.

तुह्माला गव्हाबद्दल १३॥ रुपये देणें होते पण तुह्मी १६।१।०४ रोजीं नंबर चुकीनें २४ रुपये आमचेकडून वसूल करून घेतलें तर आमचे तुह्माकडेस निघत असलेले रुपये ११॥ आणि नोटिशीचा खर्च मिळून सर्व रक्कम पोंचती करावी. नाहींतर कोर्ट मार्फत वसूल केली जाईल. ता० ६ मार्च १९०४ इ.

सही
सदू वल्लद लक्ष्मण बढे पाटील
राहणार गोंदापूर तालुका
आकोला.

## नोटीस

बेशगी-झनपूबेग वल्लद शेषगबेग राहणार गाझीपूर तालुका आकोला.

यांस.

खाली सही करणार याजकडून या जाहिर लेखानें कळविण्यात येतें कीं तुमचा आमचा शेतीचा व पडित जागेचा सवदा झाला गोरेगावची शेतें तीन मिळून किंमत १ हजार रुपये आणि सालतोडे येथील आखरचें शेत व तेथील घराची पडित जागा किंमत रुपये १९० दिडशें मिळून ११९० रुपयांत आह्मी आपला स्थावरमाल तुह्माला विकत दिला. सालतोडे हा गांव मुर्तिजपूर तालुक्यांत असल्यामुळें तुह्मी त्याच्या खरेदीचा निराळा कागद करून मागितला आणि १६।१।०४ रोजीं गोरेगांवच्या शेतीचें खरेदीखत लिहून घेऊन ११९० रुपयां पैकीं फक्त १००० रुपये तुह्मी मला दिले. बाकीचे रुपये १९० उद्यांत दिले नाहींत आणि सालतोड्याच्या शेतीच्या व जागेच्या खरेदीचा कागद करण्यात घला असें ह्मटलें असतां तुह्मी उडवाउडवीचे जबाब देतां ही गोष्ट तुमच्या भलेपणाची नाहीं.

तुह्मास आतां कळवितो कीं नोटीस पोंचल्या नंतर आठ दिवसांच्या आंत तुह्मी खरेदीच्या खर्चाची रकम व १९० रुपये आणून द्यावे ह्मणजे मी खरेदीखत लिहून नोंदून देतो. असें करण्यास चुकाल तर १००० रुपयाचें झालेलें खरेदीखत रद्द असून मी माझी गोरेगांवची शेती परत घेईन आणि तुमचे १००० रुपये सावकाराच्या दुकानात अनामत तुह्माला देण्या साठीं ठेऊन देईन.

किंवा तुमची मर्जी असल्यास आणि तुह्मी नोटिशीच्या उत्तरांत तसें कळवाल तर सालतोडे येथील शेत व जागा याचा जाहिर लिलांव करून टाकीन आणि १९० रुपयांत जी रकम कमी येईल ती तुह्माकडून खर्चासुद्धां वसूल केली जाईल. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें ता० ६ मार्च १९०४ इ.

सही
सदू वल्लद लक्ष्मण बढे
कारभारी पाटील राहणार गोंदापूर दस्तुर
खुद

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नावस्था व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रघ्न, कोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुडाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधां, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग मुष्टिमैथुनादि घातक सवयीनें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घ्यायास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांचा कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ह० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर: —

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ गों० | १ रु० | ७९ गों० | २ रु० |
| ११९ गों० | ३ रु० | १६९ गों० | ४ रु० |
| २७९ गों० | ६ रु० | ५९० गों० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातुर्जी भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवा, फुकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३ वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून कांहीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

**ORIENTAL GOVERNMENT SECURTY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED**

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C.P. Berar & Khandesh*

Head—quarters—Nagpur, C. P.

FUNDS EXCEED TWO CRORES AND TEN LAKHS

Claims paid for over One Crore and Fifteen Lakhs.

———

IMMADIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security.*

It is not sufficient to read that a Company's Fu•ls amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policie matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies. at once create a fund equivalent to the savings of many years

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the etp, do not delay. There ares numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh.*



## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दाताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हो।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां है हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणे, ते पिवळें होणें, हिरड्या दुखणें, दांत आणणें हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.



## मुंबई बँकचीं सेव्हिंग्स बँक

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीनीं ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ली जानेवारी आणि ३१ दिसेंबर यांच्या दरम्यान एक हजार रुपया पर्यंत पैसा ठेविता येईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेविता येतील. आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमास अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यास काढतां येईल.

व्याज दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपया प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं.

नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असता मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ४।७।०३ } J. Kinniburgh एजंट



## स्टोअर सप्लायर्स

आम्ही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, वाटरवर्क्स, इंजिनिअर्स इरिगेशन लोकल बोर्डस् वगैरेना लागणारे व मुंबईतील इतर सर्व प्रकारचे सामान फारच माफक दरानें पुरवितों.

धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.
जनरल मरचन्टस्
काळबा देवी पोस्ट मुंबई.



## जाहिरात

## कोडावर खात्रीचें औषध

हटकून गुण डबीस २ रुपये.

व्ही. एम. जोशी
पोलिस टाऊन नजीक उमरावती
प्रांत वऱ्हाड.



वाचा ! वाचा ! ।

(मौजच मौज. हंसूंच हंसूंच)

तुमचा वेळ आनंदात जावा अशी तुमची इच्छा आहे काय ? असल्यास खालील पुस्तकें एकवार वाचाच.

मोठमोठ्यांचे अभिप्राय मिळाले आहेत.

**नवीन तयार झालेली पुस्तकें.**

बंधुप्रेम अथवा सुंदरराव हंबीरराव, किं० १॥ रु.

भगिनीप्रेम अथवा कामांध राजपुत्र. किं० १ रु०

दोन्ही एकदम घेणारास २ रुपयांत मिळतील. व्ही. पी. ट. ख. माफ.

वासुदेव जनार्दन लेले,
बुकसेलर-मिरज.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

संस्थेविषयींचा उपदेश फार कळकळीनें व निर्लोभीपणानें करितात. हा पैसा फंड ह्मणजे एक उपयुक्त संस्था आहे. तिचें मोठेसें भांडवल उभारण्याला दीनावधि लागेल तथापि या संस्थेनें लोकांच्या दृष्टीपुढें एक आवश्यक गोष्ट नेहमीं हजर राहील आणि त्यांस संयुक्त भांडवल व देशी औद्योगिक उन्नती यांची आठवण सदा होत जाईल. आकोल्यास एक पैसा फंडाची संस्था स्थापण्यांत आली असून तिचें अध्यक्षस्थान रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्याकडे आहे. त्यांच्या हाताखालीं प्रधानमंडळीहि नेमून देण्यांत आली आहे तेव्हां ही संस्था चांगल्या नांवारूपास येईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

## राजमार्ग.

आमच्या आकोल्यांत राजमार्गाला देखील मज्जाव आहे. येथील रेल्वे स्टेशना समोरून जेलापर्यंत जाणारी मोठी सडक येथील अधिकारी मंडळीची मोठी आवडती वस्तु आहे. त्या रस्त्यानें ठिकठिकाणीं पोलिसाचा पहारा आहे. कमानीची गाडी नसली ह्मणजे त्या रस्त्यानें तो रखवाली शिपाई कोणास जाऊं देत नाहीं. या बाबर्दीत मनाई करणाऱ्या पोलिस कानस्टेबलावर एका गृहस्थानें फौजदारी खटला केला होता पण १ ले वर्ग माजिस्ट्रेट राजश्री [illegible] साहेब यांनीं असा निकाल दिला कीं पोलिसास जसा हुकूम होता तशी त्यानें मनाई केली आणि यांत त्याचा कांहींच अपराध नाहीं. या कारणास्तव ती फिर्याद काढून टाकली आहे. येथें एका खटल्याचा पहिला अध्याय संपूर्ण झाला. आणि सध्यां डिपुटी कमिशनरास प्रत्यक्ष विचारणारा कोणी मिळेपर्यंत आह्मी ह्मणतो कीं लोकांनीं बिनकमानीच्या गाड्या नेऊन आपली अप्रतिष्ठा करून घेऊं नये.

मूळ प्रश्न असा आहे कीं कोणतीच सडक बंद करण्याचा अधिकार डिपुटी कमिशनरांस नाहीं असें आह्मांस वाटतें. राजमार्ग ह्मणजे सर्व लोकांचा मार्ग; तेथून कमानीच्याच गाड्या काय पण दगडांनें भरलेल्यां देखील गाड्या जाऊं दिल्या पाहिजेत. आमच्या समजुतीनें डिपुटी कमिशनरांनीं पोलिसास दिलेला हुकूम दांडगाईचा व चुकीचा आहे. या बाबर्दीत मुनसिपाल कमिटि लोकांच्या हक्कासंबंधानें योग्य विचार करील आणि आपल्या ताब्यांतील या राजमार्गाविषयीं कांहीं पक्का निर्णय करील अशी आह्मांस बळकट आशा आहे. नवल इतकेंच आहे कीं अधिकारि मंडळी लोकांस पीडा होईल असा हुकूम बेधडक सोडतात, लोकांच्या गाड्या अडवितात व राजमार्गाचा देखील उपयोग त्यांस होऊं देत नाहींत. नामदार चीफ कमिशनर साहेब या बाबर्दीत पूर्ण विचार करितील व आकोलेकरांस योग्य ती दाद लवकर देतील अशी आशा आहे.

## नवीन शोध

तारायंत्रामुळें अंतर ह्मणून कांहींच उरलें नाहीं. किती तरी योजनांचीं योजनें लांबवर मनुष्य असला तरी तो विद्युच्छक्तीनें आपला संदेश तत्काळ कळवूं शकतो. या दृष्टीनें अंतर हा शब्द नाहींसाच होत चालला आहे. तारायंत्रानें मजकूर कळवितां येतो. पण तारायंत्रापेक्षां ध्वनिवाहक यंत्रानें त्यावरही खुबी केली आहे. या ध्वनीच्या प्रवाहानें आवाज जशाच्या तसाच लांबवर नेता येतो. कांहीं यांत्रिक युक्तीनें एक वेळ केंदेंत घातलेला आवाज वाटेल तेव्हां पुनरुक्त करिता येतो. गाणारा एकच वेळ गातो पण त्याचा तो मंजूळ आवाज यंत्राच्या साह्यानें पुस्तका प्रमाणें वाटेल तेथें नेता येतो. असा गायनाचा आवाज आपलासा केला ह्मणजे त्या यंत्राला मूळच्या गाणाराचीही गरज लागत नाहीं. आतांचा नवा शोध तर फारच विलक्षण आहे. साधारणतः चित्रलेखन पुढील वस्तूंची प्रतिमा काढून दाखविते. या कलेनें प्रकाशाचें साह्य घेतलें तेव्हां फोटोग्राफीची युक्ती निघाली. त्यामुळें क्यॅमेरा पुढील वस्तूचें यथातथ्य दर्शन चित्ररूपानें उत्तम होऊं लागलें. टेलिफोनमधून ध्वनि जसा वाहून नेता येतो तशी तसबिरीवर निघणारी प्रतिमा प्रकाशाच्या लाटांनीं दूरवर नेण्यांत येते असा नवा शोध लागला आहे. तारायंत्राच्या साह्यानें वस्तूचा फोटोग्राफ लांबवर जसाचा तसाच दाखविण्याची नवीन कला निघाली. ही युक्ती फार अद्भुत खरी ! हल्लीं प्रसिद्ध अमेरिकन विद्युच्छास्त्रवेत्ते एडिसन यांनीं ही कल्पना प्रत्यक्ष गोष्टीच्या रांगेला आणिली आहे. त्यांच्या पूर्वीच पोलांड चे महाकल्पक जान स्पानसिक यांच्या डोक्यांत ही कल्पना उतरली होती; आणि त्यांनीं प्रयोग करून त्याची सत्यताहि पाहिली होती. या नव्या युक्तीनें पृथ्वीवरील प्रदर्शनें, लढाया, नाटकें वगैरे सर्व गोष्टी आपल्या डोळ्यासमोर खेळवितां येतील आणि मग अन्तर ह्मणून तें कसलेंच राहणार नाहीं. काल व अंतर यामुळें जी दृश्य वस्तु अदृश्य होते तीच वस्तु पूर्ववत् दृश्य करण्याची ही कला होय. दृश्य वस्तूला आड करणारा जो प्रत्यवायांचा समूच्चय आहे तो दूर करणाऱ्या कलेचा नवीन शोध लागला आहे.

( आमच्या एका मित्राकडून )

लागवडी करितां जमिनीची पूर्व सिद्धता अगर मशागतः— फार दिवस पडित जमीन लागवडीस काढली ह्मणजे प्रथम नांगरणी करूं लागण्याच्या अगोदर तिची थोडीशी पूर्व सिद्धता करावी लागते. एखादे वेळीं जमीन अगदीं डोंगराच्या उतरणीवर असते, एखाद्या जमीनींत झाडें झुडपें व जंगल फार असतें. व कित्येकांत नदी नाल्यांनीं चढउतार व टेंकाडीं जाहलेलीं असतात. व कित्येक जमीनींत टोळ गोट्यांचा सुकाळ असतो. यासाटीं ज्या प्रकारची जमीन असेल त्या प्रकारें योजना करून ती साफसूफ केली पाहिजे. मग लागवडी खालीं आणल्यास मोठीशी अडचण पडत नाहीं.

झाडांची उपयुक्तता— परंतु जंगल कटाई करण्याच्या अगोदर इतकें मात्र लक्ष्यांत ठेवावें कीं जें झाड पूर्णपणें वाढण्यास अनेक वर्षेंच काय परंतु तपेंही लागलीं असतील तें झाड आपणांस थोड्या तासातच तोडतां येईल. ह्मणून कोणतेंही झाड तोडण्याच्या अगोदर प्रत्येकानें चांगला विचार केला पाहिजे. कित्येक ठिकाणीं अविचारानें झाडांची तोड झाल्यामुळें आपल्या देशाची फार नुकसानी होऊन बराच प्रदेश उजाड रखरखीत व नापीक बनला आहे. झाडाचे अनेक उपयोग आहेत. ऊन प्रखर पडलें असलें ह्मणजे किंवा तुफान वादल सुटलें असलें ह्मणजे मनुष्यास व पशुपक्ष्यांस झाडापासून सांवली व आसरा मिळतो. झाडें जमिनीवर असलीं ह्मणजे उन्हाळ्यांत जमिनीची आर्द्रता व हवा मुद्दां थंड राहते इतकेंच नाहीं तर पर्जन्यवृष्टीला झाडांच्या अस्तित्वामुळें पुष्कळ स्थैर्य येतें. खाण्या करितां व इतर अनेक उपयोगा करितां झाडावरील फळें आपणास मिळतात, व झाड जुनें होऊन त्यापासून दुसरा कांहीं उपयोग होत नसला तरी सुंदर घरें बांधण्याकरितां इमारती लांकूड तयार होतें. त्याच्याच आपण गाड्या, तारवें, नांगर व वखर करतों; यापैकीं कोणत्याही कामीं तें पडत नसलें तरी त्याचा उपयोग जळणाकडे करितात.

जमिनीवर दाट झाडें असलीं तर चांगल्या रीतीनें लागवड करितां येत नाहीं यास्तव तिच्या वरील झाडपाल्याची तोड केली पाहिजे हें खरें आहे. तत्रापि आपल्या लागवडी आड जितकीं झाडें येत असतील तितकींच काढण्याबद्दल खबरदारी ठेविली पाहिजे. शेतांत झाडें असल्यास त्यापासून अपाय होतो व लागवड करण्यात खर्चही पुष्कळ होतो ह्मणून तीं काढून टाकलीं पाहिजेत यांत कांहीं संशय नाहीं. पण शेतांतील झाडें जर कांपावयाचीं असतील तर दुसरीं चांगलीं उपयोगीं पडणारीं झाडें शेतांतील पंडित जागेंत लावावींत. अशा जागा पाराच्या बाजूला, रस्त्याच्या दुतर्फानें, घराच्या आवारांत, स्मशान भूमिकेंत, कुरणांत व दुसऱ्या पुष्कळ ठिकाणीं असण्याचा संभव असतो. झाडें लावण्यास ह्मणजे मोठासा त्रास पडतो असें नाहीं. तीं लहान असतांना त्यांचें जनावरापासून व शेळ्या मेंढ्यापासून रक्षण केलें व उन्हाळ्यांत एक दोन वर्षें पाणी दिलें ह्मणजे झाहलें. पण त्यांना खत व मसाला जर मिळाला तर तीं लवकर वाढून पाणी घालण्याचा त्रास कमी पडतो. झाडापासून भर उन्हाळ्याच्या वेळीं गुराढोरांनां सांवली मिळते तेव्हां सांवलीचीं झाडें कुरणांतून व दुसऱ्या गुरें चारण्याच्या जमीनी असतील तेथें लावण्यास कांहीं हरकत नाहीं. एखाद्या देशांतील सर्व जंगल नाहींसें झालें ह्मणजे तेथील हवामान फार अस्थिर होतें. एक तर निव्वळ आवर्षण किंवा अतिवृष्टि याशिवाय मधली स्थिती लोकांस माहीत नाहींशी होते. पाऊस पडूं लागला ह्मणजे धोधोचो मुसळधार चालून व नद्यांस मोठमोठे पूर येऊन सर्व पाणी जलद निघून जातें. परंतु कांहीं कांहीं दिवसाच्या अंतरानें भिजपाऊस शेतकरी लोकांस पाहिजे असतो तसा फारच क्वचित् प्रसंगीं पडतो. येणें प्रमाणें वृक्षांचा फारच उपयोग आहे.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—उष्णतेचें मान हळूंहळूं वाढत आहे. मध्यंतरीं चालू असान्त पक्षांत जी गारांची वृष्टी सर्व प्रांतभर झाली तिनें हवेंत गारठा बराच आला. मलकापूर, अकोट, इलिचपूर इत्यादि भागांत आंब्याचा मोहर अगदीं झडून गेला. रोगराईलाही थोडा बहुत जोर पोचला आहे. यंदा चाऱ्याची महर्गता विशेष आहे.

रा. रा. काशीनाथ श्रीराम जठार असिस्टंट कमिशनर, रेसिडेन्सी बोलाराम, यांनीं ४॥ महिन्यांची आजारीपणाची रजा घेतली आहे. ती रजा संपल्या नंतर त्यांची नेमणूक वऱ्हाडांतच होईल असा अंदाजा आहे.

रा. रा. ब्याटन साहेब जुडिशिअल कमिशनर हे आजारी असल्यामुळें लेफ. कर्नेल ग्यारेट सिव्हील आणि सेशन जज्ज यांस आफि० जुडिशिअल कमिशनर नेमण्यांत आलें. रजा मिळाल्या अन्वयें ते विलायतेस जाण्याच्या मार्गाला लागणार इतक्यांत त्यांस न्यायखात्यांतील श्रेष्ठ स्थानाचा लाभ झाला. ही विहंगम गती मौजेची खरी !

रा. रा. गंगाधर राघजी सोहनीं सब डिपुटी इनस्पेक्टर, आकोला यांनीं गेल्या १०वे तारखे पासून पेनशन घेतलें. राजश्री गंगाधरपंत हे १८७३ सालीं डाक्टर सिंक्लेर साहेबांचे वेळीं वऱ्हाडांत आले. हे आपल्या कामांत दक्ष, व चौकस असून चांगले मितव्ययी आहेत. शिक्षक व परिक्षक या दोहोंचा चांगुलपणा यांस अनुभवानें कळला आहे.

प्लेग—चालूं सप्तकांत आकोल्यास ३६ लोक प्लेगानें आजारी झाले व ३९ मृत्यु झाले त्यापैकीं ३६ प्लेगाचे मृत्यु होते.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १०० |
| सोनें २४।= | | चांदी ७१। |
| ज्वारी ९०–९२ | | कापस ८० |
| गहूं | | ९० |
| बाजरी | | ९२ |
| मीठ | ३॥ | रु. मण |
| चणे | २॥। ते ३ | रु. मण |
| तूप | ८॥ | रु. मण |
| तेल | ४॥। | रु. मण |
| रुई जीन | | ८४ |
| कापूस | | ९९–६० |

## वर्तमानसार

ठाण्याच्या अरुणोदय पत्राचे चालक रा. काशिनाथ विष्णु फडके यांस गेल्या आठवड्यांत देवाज्ञा झाली. मरण समयीं यांचें वय ७६ वर्षांचें होतें. आरंभापासून यांनीं त्या पत्रा संबंधानें फारच परिश्रम घेतले आणि निस्पृह लोकसेवेचा यांनीं उत्तम कित्ता घालून दिला. त्यांच्या मरणामुळे मराठी भाषेचा एक चांगला लेखक नाहींसा झाला म्हणण्यास हरकत नाहीं. यांचे चिरंजीव अरुणोदयाचीही पितृसंस्था चिरकाल चालवितील अशी आशा बाळगितों.

' कलकत्यास राष्ट्रीय स्मारक मंदीर उभारण्यासाठीं लार्ड कर्झन साहेबांनीं जारीनें तयारी चालविली आहे. या मंदिरास लागणाऱ्या संगमरवरी दगड ग्रीस देशांतून आणावयाचा आहे; आणि बांधणी इटालियन पद्धतीवर होणार आहे; हे मंदीर ४१० फूट लांब ३०० फूट रुंद व १८६ फूट उंचीच्या घुमटाकार उभारावयाचें आहे मध्यभागी ६४ फूट व्यासाचा वर्तुळाकार मोठा व मुख्य हॉल होईल असें म्हणतात.

रशियानें इंग्लंडच्या कोळशाचीं जीं जहाजें धरलीं तीं दहा दिवस आपल्या ताब्यांत ठेवून आरम्या हुकमावरून सोडून दिलीं.

—केन्नाहून मुंबईस आलेला रशियन लष्करी अधिकारी कर्नल कॉर्निलॉफ हा ता' २६ रोजीं सुवेझकडे एका आगबोटीनें निघून गेला हिंदुस्थानांतून दिल्ली, आग्रा, पेशावर, वगैरे शहरें पाहात पाहात केन्नाहून तो मुंबईत आला होता. यानें इराणचे आग्नेयभागांतही प्रवास केला आहे असें म्हणतात। श.

## सुवासिक द्रव्यांचें प्रकार.

सुवासिक द्रव्यें एकंदर चार प्रकारचीं आहेत. पहिला प्रकार झाडांच्या चिकापासून किंवा सालीपासून काढलेल्या द्रव्याचा. कित्येक झाडांवर प्रहार करून त्या प्रहारांपासून निघणाऱ्या द्रव्यापासून सुवासिक द्रव्यें काढतात. उदाहरणार्थ, कापूर, वगैरे. दुसरा प्रकार अत्तरें वगैरे तयार करण्याचा हा प्रकार आपल्याकडे फारच प्रचारांत आहे. तिसरा प्रकार फुलांचा किंवा सुवासिक पानांचा चुरा करून यांचा सहचर्यानें सुवास आणावयाचा. आणि चवथा प्रकार प्राण्याच्या शरीरापासून उत्पन्न होणाऱ्या द्रव्याचा कस्तुरी वगैरे हा प्रकार आहे.

## पवनचक्या आणि विद्युल्लता.

आजपर्यंत पवनचक्क्यांकडे कोणी पाहत नव्हतें. परंतु अर्वाचीन पवनचक्कीच्या योगानें विद्युत्प्रकाश उत्पन्न करण्यात येत आहे. नेटेरियन येथें एका पवनचक्कीपासून एका मोठ्या रस्त्याच्या कारखान्यात ३० दिवे लावण्यापुरती विद्युल्लता मिळते. रोझवेग होलस्टेन येथील पवनचक्कीपासून ३० नळ सारखे चालते राहतात. डुलेडार्फ येथें एक पवनचक्क आहे त्याचे योगानें एक भारी वजनाचा गोळा गुंडाळून वर आणला जातो आणि तो खालीं सोडला म्हणजे त्यापासून एक प्रखर विजेचा लोट तयार होतो. क०

इसवी सन '८६३ पासून १८८३ पर्यंत तिस वर्षांत सगळ्या हिंदुस्थानांत बी. ए आणि एम. ए मिळून ५,००० पेक्षां जास्त झाले नाहींत; परंतु इ. स. १८९१।९२ पासून १९०१ पर्यंतच्या १० वर्षांत ११७५ एम. ए. झाले आणि १२५३३ बी. ए. झाले. ना. व.

' मराठी शालापत्रकाच्या फेब्रुवारीच्या अंकांत शब्दाची सिद्धी कशी करावी व सिद्ध असलेल्या शब्दांची व्युत्पत्ती कशी शोधून काढावी या संबंधानें काहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. या भाषा विषया संबंधानें सदर्हू लेखकांनीं आपले विचार चांगल्या विस्तारानें प्रसिद्ध करावे अशी आमची मुद्दाम शिफारस करितों.

जोडी, करेला, डम्ब बेल्स, लांकडी किंवा दगडी हत्ती, मल्लखांब, पारलल बार्स वगैरे व्यायामाचीं उपसाहित्यें फार उत्कृष्ठ आहेत पण हीं उपलब्ध नसतील तर दोन तिन हाताच्या खुर्च्या किंवा स्टूल यांच्या साह्यानें नानाविध व्यायाम करण्याची युक्ती अमेरिकेंत निघाली आहे.

मद्रास युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परिक्षेच्या वेळीं दोन उमेदवारांनीं लबाडी केल्यावरून त्यांस एक वर्षांपर्यंत परिक्षेस बसविण्याची मनाई करण्यांत आली आहे व दुसऱ्या एका उमेदवारावर विशेष मोठा आरोप शाबित झाल्यावरून त्यास यापुढें कोणत्याही परीक्षेस बसण्याची बंदी करण्यांत आली आहे.

अमेरिकेंतील प्रसिद्ध उदार गृहस्थ मि० कार्नेजी यांनीं हल्लीं आपला सर्व उद्योगधंदा बंद केला असून आपल्या जवळील पैशाचा उपयोग लोककल्याणाच्या कामाकडे करण्याचें आरंभिलें आहे. या रीतीनें गेल्या वर्षांत त्यांनीं एकंदर ४२००००० पौंडाच्या देणग्या दिल्या.

गेल्या रशिया जपानच्या लढाईंत जे रशियन व जपानी लोक घायाळ झाले आहेत यांच्या औषधोपचारासाठीं म्हणून पारिस मुनसिपालिटीने २० हजार फ्रान्क देण्याचा संकल्प केला आहे. रशियाला जय मिळावा अशी मनिषा प्रदर्शित करणारें एक मानपत्रही धाडण्यांत आलें.

चिनानें स्वस्थ रहावें असें रशिया म्हणतो पण रशियानें चिनांतही अंतःप्रवेश हळूं हळूं चालविला आहे, जपानची लढाइ सध्यां शांत वाटते. विलक्षण छापे, तोफांची सरबत्ती, आरमारांची चकमक इत्यादि कांहींच ऐकू येत नाहींत.

रत्नागिरी — बावबिळांत धुरी घालून महाळुंगी गांवीं तेथील लोकांनीं एक वाघ मारला तों आज बदला दुसरा वाघ आला आहे.

भोवलराज— या संस्थानास ३१४ लाख रुपये कर्ज असतां व कै. राजानें ट्रस्टीच्या सल्लयावांचून राणीनें कोणताही खर्च करूं नये असें मृत्युपत्र लिहून ठेविलें असतांही तेथील असमतपन्हा राणीनें डाका शहराजवळ सरकार खर्चानें जी कॉलेजकरितां इमारत बांधली जाणार आहे त्यास जोडून कर्झन हॉल बांधण्याकरितां सवा लाख रुपये दिले व युरोपियन कामदारांनी ती देणगी निमुटपणे स्वीकारली आहे.

काठेवाड— या प्रांतांतील संस्थानिकांनी काहीं बंदरें सरकारनें आपल्या ताब्यांत घेऊन विरमगांव येथें नविन कस्टम अफीस स्थापन केलें आहे. राजकोटाहून नडियादकडे लग्नकार्यासाठीं जे लोक जातात यांजवळील दागिन्यावर शेंकडा पाच रुपये प्रमाणें जकात घेण्यांत येते व सहा महिन्यानंतर परत आल्यास त्याच मनुष्याकडून पुन्हां जकात वसूल करितात. या जुलमामुळें काठेवाडांत लग्नकार्यास जाणें नको, असें तिकडील लोकांस वाटू लागलें आहे.

इंदूर— ३१२२०.५० इंदुरी रुपये गाळून त्याचे इंग्रजी रुपये केले.

ठराव— कोणाही सरकारी पेनशनरांचें वर्तन गैरशिस्त असल्याचें दिसल्यास त्याचे सर्व पेनशन बंद किंवा कमी करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारानें आपणाकडे राखून ठेवला आहे.

दंगा— फिरस्ते बलूची लोकांची एक टोळी हैद्राबादेकडून इंगोली येथें येऊन या लोकांनीं आपसांत भांडण करून मारामारी व दंगा केला. कोतवालीचे लोकास ते बिलकूल जुमानीत नाहींत असें दिसे दुय्यम तालुकदार सा. व तहशिलदार साहेब यांस क्या. फॉरल सा. कडे निरोप पाठवून लष्करी लोकांची मदत घ्यावी लागली. लष्करी हत्यारबंद घोडेस्वारांनीं पोलीसचे मदतीस येऊन दंगा मोडला. तिसरे दिवशीं बलूची टोळी येथून वऱ्हाडास चालती झाली. येथून वाशीमपर्यंत त्या लोकांनीं बरीच बदमाशी केली. सडकेचे बाजूस असलेले कित्येक खेडगांवांत शिरून गरीब कुणबी लोकांस फार त्रास दिला व पैसे जबरीनें वसूल केले.

काबूल येथील अमीर साहेबास हल्लीं चाललेल्या रशिया व जपान यांतील युद्धासंबंधानें अत्यंत कळकळ वाटत आहे. त्या लढाईची ताजी बातमी बरोबर समजण्याकरितां मुद्दाम त्यानीं दररोजचीं इंग्रजी वर्तमानपत्रें काबुलास दररोज आणविण्याची खास व्यवस्था केली आहे. ज्ञ. प्र.

गेल्या आठवड्यांतही यंगहजबंड व तिबेटी सेनापती यांच्या मुलाखती झाल्या नाहींत. या सेनापतीस तह करण्याचा लामानें अजूनही दिलेला नाहीं, असें इंग्रजी पत्रें म्हणतात. यासाठीं ल्हासाकडे पुढें चाल करण्याची तयारी झाली असून मोहिमेचें कूच १५ मार्चचे सुमारास सुरू होईल, असें म्हणतात!

भूतानचे दरबार इंग्रजी सामान वाहून नेण्यासाठीं कांहीं याक जनावरांचा एक तांडा पंजाबातील पाठविणार आहे!

तिबेटी लामाकडून मिशन निघून सेंटपीटर्सबर्ग येथें फेब्रुवारीमध्यें पोंचणार होतें. पण ' तें त्यावेळीं न पाठविता पुढें पाठवावें म्हणजे सोयीचें होईल; ही वेळ या कामास योग्य नाहीं ' असें रशियन सरकारानें कळविल्यामुळें तो बेत तूर्त रहित झाला आहे; पण येत्या मे महिन्यांत हें मिशन लामांनीं दिलेला नजरनजराणा घेऊन झारचे सेंटपीटर्सबर्गला जाईल, असें समजतें.

तांबड्या समुद्रांत नांगरलेल्या रशियन लढाऊ जहाजांनीं एड्रिकहेड व फ्राकवी ह्या इंग्रजी आगबोटी व कोळशांनीं भरलेली मथिल्डा नांवाची एक नॉर्वेजियन आगबोट अडवून पाहाणी केली आहे.

मि. जे. एन. टाटा यांची वृद्धपत्नी बाई हिराबाई या मुंबईस गेल्या गुरुवारीं अर्धांगवायूनें मृत्यु पावल्या. मि. टाटा हल्लीं इजिप्तमध्यें केरो येथें आजारी होते तेथून ते नेपल्स येथें गेले आहेत. तेथें त्यांची प्रकृती बरी आहे.

सिरसी येथील मरिआईचे जत्रेचे वेळीं भरलेलें प्रदर्शन तारीख ५ रोजीं बंद झालें. शेवटचे दिवशीं कलेक्टर सरदार पानसे व बडे युरोपियन अधिकारी आले होते. नेहमीं प्रमाणें औपचारिक भाषणें होऊन प्रदर्शनांत जिन्नस पाठविणारांस एकंदर १५० चांदीचीं, पदकें, सर्टिफिकिटें व रोख रुपये देण्यांत आले.

मुंबईस सुरू झालेल्या जपानी अनाथफंडास आतापर्यंत एकंदर २० हजार रुपयांची रक्कम जमली, असें म्हणतात.

जमखंडी संस्थानचा पैसा लबाडीनें गिळंकृत करण्याचा गुप्त कारखाना गेल्या २० वर्षांपासून सुरू असल्याचें उघडकीस आलें असून त्यासंबंधानें तूर्त एका कुळकर्ण्यावर हल्लीं तेथील कारभाऱ्यापुढें खटला चालला आहे. कारभाऱ्यांचें व आपलें बरें नाहीं, यांनीं एक महत्वाचा कागद फाडला, सबब खटला दुसरीकडे वर्ग करण्याबद्दल अर्ज झाला असून या कागद फाडण्याचे संबंधानें कारभारी आणि आरोपी यांचे जबाब घेण्याबद्दल पोलिटिकल साहेबांनीं दस्तादारास हुकूम केला आहे. आरोपीची इस्टेट जप्त केलेली असून ती कशी उधळण्याबद्दल अर्ज झाले आहेत. आरोपी तर्फे तूर्त विलायतेहून मि. देसाई वकील काम चालवीत असून युरोपियन बॅरिष्टरही येणार म्हणतात. या खटल्यानें जमखंडींत फारच कळकळ उडाल्याचें समजतें.

मद्रास इलाख्यांत सानथोम नांवाचें कोळ्यांचें गाव आहे. त्यामधील रस्त्यांतून सोजीर दारू पिऊन जात असतां त्यांजवर कांहीं कोळ्यांनीं विनाकारण हल्ला केला. सोजीर बेताच्या छड्यांनीं आपलें संरक्षण करूं लागले. तेव्हां हुन्नारी कोळ्यांनीं जमाव करून त्या सोजीरास गाठून बेदम मारलें, अशी बतमी असून त्याबद्दल मद्रासच्या पोलीस कोर्टांत खटला चालला. मद्रासच्या बिशपसाहेबांनीं फिर्यादीतर्फे साक्ष दिली; यानंतर इतर साक्षीदारांच्या ही जबान्या झाल्या. पण दंग्याचा सर्व दोष सोजीराकडे आहे, ते दारू पिऊन झिंगले होते; व गरीब नेटिव लोकास विनाकारण छड्यांनीं मारीत होते असें सिद्ध झालें असून कोळ्यांनीं जर सोजीरास मारलें असेल तर तें स्वसंरक्षणार्थ असलें पाहिजे. सोजीरानीं कोर्टांत खोटी साक्ष दिली आहे. असें म्हणून मॅजिस्ट्रेटनें कोळ्यांस सोडून दिलें आहे.

REGISTERED No. N. 4

आकोल्यातील लोकांस.................१ रु.
बाहेरगांवी टपालहाशिलांसह......... २ रु
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.......................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस.... .... ....०१

Town ... ... ... ... 1 Rs.
Mofussil ... ... ... 2 ( With postage
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ... ... ... 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 8 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 21 MARCH 1904 NO 11

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २१ माहे मार्च सन १९०४ इ० अंक ११

*PROCLAMATION*

The following gentlemen have been elected members of the Shegaon Municipal Committee to fill up the vacancies caused by the retirement of members under the operation of rule 31 of the rules framed under Berar Municipal Law and published in Hyderabad Residency Orders notification No. 256 dated the 19th December 1899.

| Messrs | Ward No |
|---|---|
| Mathuradas Rautmal | IV |
| Maroti Chandrabhan | V |
| Tansook Hazarimal | VI |

V. G Deshmukh
Secretary
Municipal Committee
Shegaon.

15/3/04

## नोटीस

रा० रा० भगवान बाबुनो डिपो राहणार चिचखेड ता० जळगांव पोष्ट पिंपळगांव काळे.

यांस—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुम्ही ता० २२।२।०४ च्या वऱ्हाडसमाचार पत्रांत नोटीस दिली ती पावली. तुमचा मजकूर खोटा. आहे मी पंचरदीवा समक्ष जे कबूल केलें त्या प्रमाणें पावती दिली आहे. तुमचा आमचा करार असा होता कीं मी चिचखेडचें सर्वे नंबर ४३ पैकीं एकर गुंठे १०।२६ चे शेत खरेदी घेऊन, एक ३२ सालच्या हकूमनामा व दुसरा महादू वा. परशराम पाटील याचे पुर्जा बदलचा अशा दोन हकुमनाम्याचा व जी काहीं खातेबाकी असेल तिचा अशा इतक्यांचा निकाल करून त्याबद्दल मी तुह्मास पावती द्यावी. त्या प्रमाणें मी तुह्मास पावती दिली परंतु अलीकडे तुमचे मनांत बेमानकी येऊन इटखेड्याचे शेताबद्दल जो हुकूमनामा मी मिळविला त्याबद्दल मला काहीं देऊ नये असें तुमचे मनांत असल्या करून तुह्मी नोटीस दिली परंतु हे अगदीं तुह्मी गैर केले. आम्ही मुळींच इटखेड्याच शेताचे हुकूमनाम्याबद्दल पावती देण्याचे कबूल केले नाहीं इतकेंच नाहीं तर त्याबद्दल गोष्ट देखील काढली नाहीं असें असतां विनाकारण त्रास देऊन नोटिशीचे खर्चांत पाडलें सबब नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल.

दुसरे चिचखेडचे शेत सर्वे नंबर ४३ त्यांबद्दल मी सर्व वी मुखत्यार आहे मी त्याची वाटेल ती व्यवस्था करीन. सदहू शेत मी रा. बापू वल्लद रावजी कारभारी पाटील यांस विकले आहे. त्या विक्रीचे आड तुह्मी येऊं नये आल्यास तुह्मास सर्व प्रकारें जबाबदार धरले जाईल. कळावें. तारीख १८ माहे मार्च सन १९०४ इसवी.

सही
इच्छाराम वल्लद परशराम साहू
दुकान मेंडवळ तर्फे मुखत्यार
सदाराम सवाईराम राहणार
मेंडवळ ता० जळगांव
पोस्ट पिंपळगांव काळ्यांचे
दस्तुर खुद्द

## नोटीस

बेशमी भगवंत सिताराम जात कृष्णपक्षी राहणार शहर आकोले तालुके व जिल्हे मजकूर यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तुमचे स्वतःचे राहते घर रा. सुंदरलालचे घराजवळचे तारीख २६।२।१२.०४ इसवी रोजीं आह्मांस खरेदी दिले. त्या प्रमाणें त्या खरेदीचे आधारें तोंडीं दिला असून खरोखरी घराचा प्रत्यक्ष ताबा अद्याप दिला नाहीं. व घर खालीं करण्यास आठ दिवसाची मुदत मागितली. त्या प्रमाणें तुह्मी घर खालीं करून दिलें नाहीं. त्यामुळें माझें भाड्याचें नुकसान होत आहेत व दाहा रुपये दरमाहानें लोक मागत आहेत त्या प्रमाणें तुह्मी आठ दिवसांत घर खालीं करून द्यावे. न दिल्यास दरमाह १५ रुपये प्रमाणें भाडे तुमचे पासून कोर्ट मार्फत खरेदीखतचे तारखे पासून वसूल केले जातील. ह्मणून आगाऊ सुचविलें आहे. कळावें तारीख १६।३।१९०४ इसवी०

सही
येशवंतराव व गोविंदराव देशमुख
राहणार हात दस्तुर खुद्द.

## जमीन

( तिचा उगम व रचना )

एखाद्या पूर्व कालच्या लेण्यांत जाऊन पाहिलें असतां यांच्या भिंतीवरील कोरलेलीं अक्षरें किंवा ५।२५ वर्षांच्या मागें बांधलेल्या समाधी वरील अक्षरें आपण पाहिलीं असतां तीं आपणांस वाचतां येत नाहींत इतकीं तीं झिजलेलीं असतात ह्या वरून असें दिसतें कीं दगडासारखा कठीण पदार्थ सुद्धां कालांतरानें झिजतो. आतां एखाद्या दगडाची पूड रांगोळी प्रमाणें बारीक करून ती जर पाण्यांत घालून ढवळली तर तें पाणी गढूळ झालें आहे असें आपणास दिसून येईल. तें गढूळ झालेलें पाणी दुसऱ्या भांड्यांत काढून त्यांत पुन्हां स्वच्छ पाणी घालून ढवळलें तर तें ही पहिल्यापेक्षां कमी पण थोडेंसें तरी गढूळ होईल. अशा रीतीनें पाणी स्वच्छ निघेतों पर्यंत केलें तर खालीं कठीण व कचकचीत रेव राहील हीच वाळू होय. नंतर दुसऱ्या भांड्यांत काढून ठेवलेलें पाणी काहीं वेळ स्थिर ठेवल्या नंतर तेंच निर्मळ होतें व हें पाणी ओतून टाकलें असतां खालीं काहीं गाळ सांचलेला सांपडतो. हा गाळ बहुत करून चिकट व मऊ असतो. ही चिकण माती होय. अशा रीतीनें पण बऱ्याच कालगतीनें बहुतेक खडकाचें रूपांतर होऊन त्याची वाळू व माती बनते. कित्येक दगडाचे चूर्णापासून फक्त वाळूच उत्पन्न होते व कित्येकांची चिकण माती बनते. झाडें कठीण खडकावर मुळींच होत नाहींत परंतु जमिनीच्या पृष्ठ भागावर मातीचा जो भुसभुशीत थर असतो त्यांत वाढतात. कोणत्याही प्रकारची थोडीशी माती घेऊन तीवर सांगितलेल्या खडकाच्या चूर्णाप्रमाणेंच धुतली तर तिचेही वाळू व चिकण माती असे दोन भाग करितां येतील. तेव्हां माती व खडकानें चूर्ण हीं एकच होत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु खडकाच्या पुडीचा रंग भुरका असतो व मातीचा रंग खडकाच्या चूर्णापेक्षां पुष्कळ काळा असतो हीच माती एखाद्या लहानशा बशींत किंवा भांड्यांत घालून विस्तवावर लाल भडक होई तों पर्यंत तापवावी व निवल्या नंतर वजन करावी ह्मणजे ती वजनांत पुष्कळ कमी भरते, व तिचा रंगही पुष्कळ फिका पडतो. ह्यावरून मातीपैकीं काहीं भाग जळून नाहींसा होतो असें सिद्ध होते, हा जळून जाणारा भाग जो असतो तो जमीनींत उत्पन्न होऊन मेलेल्या किडे व जीव जंतु व लहान सहान झाडांचे सडून गेलेले शेष राहिलेले अंश त्यापासून बनलेला असतो. हा अग्निग्राह्य पदार्थ आहे यास सचेतन असें नांव आहे. तेव्हां माती ही खडकाचें चूर्ण व सचेतन पदार्थ ह्मणजे प्राणिज व वनस्पतिज अंश यांच्या संयोगापासून झालेली आहे.

## खडकापासून माती बनण्याचीं कारणें

खडकापासून माती बनण्याचीं कारणें:—

खडकाच्या चूर्णापासून माती बनते ती खालीं लिहिलेल्या कारणामुळें होते.

( १ ) एक चपटा लहानसा दगड घेऊन तो चुलींत लाल भडक होई तों पर्यंत तापवावा व लागलीच गार थंड पाण्यांत बुडवावा ह्मणजे त्यावर लागलीच बारीक बारीक भेगा पडून एखाद्या वेळीं त्याचे तुकडे ही होतील. त्याच प्रमाणें सृष्टी क्रमांत खडकाचें ही चूर्णीकरण होतें. सूर्य एखादे दिवशीं प्रखर तापल्या नंतर पाऊस पडून जिकडे तिकडे गारठा पडतो. किंवा आफ्रिकेंतील सहारा मैदाना सारख्या ठिकाणीं दिवसा अतिशय ऊन पडतें ह्मणजे रात्रीं त्याच्या उलट अतोनात थंडी पडते. वातावरणांत व सभोंवतीं असें स्थित्यंतर वारंवार फेरफार जाहले ह्मणजे खडकांत प्रथम मोठमोठ्या भेगा पडून तो फुटतो काहीं दिवसांनीं त्याचे बारीक कण बनतात.

( २ ) खडकाचे बारीक तुकडे जाहले ह्मणजे त्याच्या भेगेंत पाणी मुरतें व त्यामुळें खडकाचे जितके भाग उघडे पडले असतील तितके नरम होऊन त्यावर दुसरे अनेक व्यापार चालू होतात. आपली स्नानाची व धोतरें धुण्याची जी जागा असेल तेथील फरशीच्या उघड्या भागावरील पोपडे कसे निघतात हें ज्यांनीं पाहिलें असेल त्यांच्या ध्यानांत ही गोष्ट तात्काळ येईल.

( ३ ) लोखंडाची एखादी पट्टी उघड्या हवेंत ठेवली तर काहीं दिवसांनीं तिचा पृष्ठभाग अगदीं तांबूस दिसतो व त्यावरील कीस निघूं लागतो. त्यास जंग असें ह्मणतात प्रत्येक खडकांत लोखंडाचा अंश फार थोड्या प्रमाणानें असतोच. खडकाचा पृष्ठभाग हवेंत उघडा पडला ह्मणजे हा लोखंडाचा अंश हवेनें गंजून दगडाच्या पृष्ठ भागावर तांबडा रंग चढतो व तो पावसानें वाहून गेला ह्मणजे त्याच्या खालचे भाग उघडे पडतात व त्यांतील लोहावर हवेची क्रिया घडून पुन्हां त्याचा जंग बनतो. हाही पावसानें धुऊन जातो. या रीतीनें सर्व खडक मऊ होऊन त्याचे तुकडे तुकडे पडतात.

(४) उन्हाळ्यांत नदी आटली ह्मणजे तिच्या पात्रांतील खडक असतात ते अगदीं मऊ व वाटोळे दिसतात व त्यांच्या पृष्ठभागावर पुष्कळ लहान लहान भोंकें पडलेलीं असतात. हा पाण्याच्या घर्षणाचा परिणाम होय. पाणी सतत कमी ज्यास्त जोरानें वाहत असल्यामुळें व त्यांत अनेक पदार्थ दगड व रेती तितक्याच जोरानें एकमेकावर गडगडत व सर्वत्र खडकावर आदळत आदळत खालीं जात असल्यामुळें परस्परामध्यें घर्षण उत्पन्न होऊन खडकाच्या आणकोच्या व टोकें अगदीं वाटोळीं होतात. ह्याप्रमाणें नदीपात्रांतील खडकावर पुष्कळांनीं वाटोळे उखळाच्या आकाराचे खळगे पाहिले असतील ज्याप्रमाणें भोंवऱ्यांत एखादा जिन्नस सांपडला ह्मणजे तो गरगर फिरतो त्याचप्रमाणें खडकाच्या एखाद्या फटींत वाटोळा दगड अडकून तो तेथल्या तेथेंच गरगर फिरत राहतो व ह्यामुळें हे खळगे पडतात. हा प्रकार ज्या ठिकाणीं धबधबा असतो त्या ठिकाणीं दिसण्यांत येतो. अति वेगानें वाहणारें पाणी आपल्या वेगा बरोबर दगडाचे मोठेमोठे तुकडे व रेती हीं वाहून नेतात. व पाणी जरा स्थिर जाहलें ह्मणजे नदीच्या दोन्ही तीरास त्याचे निरनिराळे थर बसतात. हे दगड व वाळू पाण्या बरोबर वाहूं लागले ह्मणजे यांच्या परस्पर घर्षणापासून सर्वांना सारखीच झीज लागते.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध ४ शके १८२६

## कचेऱ्यांच्या वेळा

आमच्या जिल्ह्यांतील कचेऱ्या तारीख १ ली एप्रील पासून १५ जून पावेतों सकाळचे ८ वाजल्या पासून दोन प्रहरच्या २ वाजे पर्यंत भरविण्यांत येतील असा हुकूम या जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी मेजर कोलंब यांनीं फर्मावला आहे. राजा बोले आणि दळ चाले या रितीनें डेपुटी कमिशनरांच्या हुकुमाच्या अंमलबारीला आज पासून दहा दिवसांनीं आरंभ होईल. सदर्हू कचेरीची वेळा ही प्रथमच या जिल्ह्यांत मुक्रर केली जात आहे आणि तिच्यापेक्षां दुसरी गैरसोयीची वेळा दुसऱ्यास निवडूनही काढतां येण्यासारखी नाहीं. अत्यंत गैरसोयीची वेळा ह्मणजे सकाळचे ८ पासून २ वाजे पर्यंतचा काल होय. ज्यांस या हुकुमापासून पीडा होणारी आहे अशा लोकांचा वर्ग मोटाच आहे. त्या वर्गापेक्षां जो मोठा समुदाय सेवक गर्गाचा आहे त्याला ही अत्यंत पीडा होत असली तरी ' जी हुकुम ' ह्मटल्या वांचून गतीच नाहीं. सेवाधर्मच त्यांस सांगेल कीं आज्ञा अक्षरशः पाळणें हाच सात्विकपणा होय. तोंडांतून ब्र काढण्यापासून सेवकजनांची मोठी मानहानि होते. असते. अलिकडे चाकर मंडळीचा जो मानपान राहत असतो तो पाहिला ह्मणजे ते मौनव्रत धरतात आणि देव ठेवील तसें राहतात हीच गोष्ट बरी करितात असें दिसून येईल. सेवक मंडळी प्रमाणेंच सर्व अडचणी कोर्टांत येणाऱ्या साक्षिदारांस व पक्षकारांस येतील आणि अर्जनवीस, व स्टांप वेंडर वगैरे स्वतंत्र मंडळीही याच दुःखांत तळमळत पडतील. कचेऱ्यांच्या वेळाचा प्रश्न बराच सार्वजानक दिसतो ह्मणून आह्मी त्या संबंधानें लोकमताचें हें प्रकाशन करीत आहों.

नेहमींचे कचेरीची वेळा ११ वाजल्या पासून ५ वाजे पर्यंतची आहे. उन्हाळ्या निमित्त या वेळा बदलत असतात. दोन प्रहराचा सुमार झाला ह्मणजे त्यापुढें एक प्रहर किंवा सव्वा प्रहराचा वेळ मोठा तापकारक होतो, त्यावेळीं शरीराला विश्रांती मिळावयाला पाहिजे असते. ही गोष्ट लक्ष्यांत आणून व इकडील प्रखर उन्हाळा पाहून दर वर्षीं सकाळीं कचेऱ्या भरविण्याची योजना करण्यांत येत असते. सकाळची वेळ ह्मणजे ६ पासून किंवा ७ पासून १० किंवा ११ वाजे पर्यंतचा काळ मुक्रर करीत असतात. हा काल किंबहुना मध्यान्हापर्यंत लांबविला ह्मणजे पराकाष्टा झाली. दोन प्रहरीं सरकारी मंडळी, पक्षकार, वकील वगैरे सर्व लोक घरोघर जाऊन सुखानें विश्रांती घेत बसतात. हा हेतु सकाळच्या कचेरीचा आहे.

ही कचेरीची वेळा ८ वाजल्या पासून २ वाजेपर्यंतच नियमित केलीं तर किती विपरीत गोष्टी घडतात हें पाहण्यासारखें आहे. कदाचित या घटका युरोपिअन तऱ्हेनें राहणाऱ्या लोकांस सुखावह असतील. सकाळीं ८ वाजतां छोटी हाजिरी झाल्यावर दोन वाजतां टिफीन ठीक पडत असेल. आणि टिफिन झाली कीं लागलीच विश्रांती आहेच. हा उपक्रम त्या रितीच्या लोकांस कदाचित् पुष्कळ सुखावह होईल. परंतु बाकींच्या हिंदु मुसलमानांची स्थिती तशी नाहीं. त्यांस घरच्या दुवक्ता जेवणा पलिकडे उपहार ठाऊक नसतो. स्नानादि कर्म आटोपल्या शिवाय पुष्कळांस भोजनाचा मार्ग खुला नाहीं. घरोघर स्वयंपाक आठ वाजण्या पूर्वी होण्याचा संभव नाहीं. त्या शिवाय बाहेर गांवाहून जे लोक कचेरीच्या कार्या निमित्त येतात त्यांस कचेऱ्यांतून आठ वाजल्या पासून अडकून टेविलें तर त्यांचा उपासमाराच होईल. आमच्या देशांत दोन प्रहरीची वेला ह्मणेज भोजनवेळा आहे. त्या वेळीं निदान लोकांच्या मुखांत चार सुग्रास पडणार नाहींत तर त्यांची दैना व बेंडाळी फार मोठी होईल. सकाळच्या उद्योग घटका सरकाराला कबूल नसतील तर त्यांनीं नित्याची अकरा वाजण्याचीच वेळ चालूं ठेवावी. या वेळाची अर्धशतकाच्या इंग्रजी अंमलानें लोकांस संवय लागलेली आहे. ती वेळ आतां अंगीं खिळलेली आहे व तिच्या संबंधानें दीर्घ परिचयामुळें विशेषशी कुरकुर राहिलेली नाहीं. सारांश, रोजची नित्याची कचेरीची वेळ बरी किंवा सकाळची बारा वाजण्यापर्यंची वेळ बरी- या शिवाय दुसरी कोणतीच वेळा सोयीची अशी नाहीं. सकाळच्या कचेरीचा प्रश्न दरसालचा आहे पण त्याचा निकाल यंदा प्रमाणें हा पहिलाच आहे. हा मोठा असमाधान कारक आहे आणि त्यासंबंधानें लोकांच्या अडचणी डेपुटी कमिशनर साहेबांनीं अवश्य लक्ष्यांत घेतल्या पाहिजेत आणि वरील साधकबाधक गोष्टींचा योग्य विचार करून त्यांनीं आपला हुकूम फिरवावा असें आह्मी मुद्दाम त्यांस मोठ्या नम्रतेनें सूचवीत आहों.

यंदाच्या सालीं वरील अडचणींत एक विशेषच भर पडली आहे. वरील वेळे संबंधानें लोकांची मोठी तक्रार आहे. लोक प्लेगामुळें गांवाबाहेर आहेत. पुष्कळांस बायसिकल, गाड्या, घोडीं इत्यादि सुखाव ह वाहनांचीं साधनें अनुकूल नाहींत. त्यांस दोन प्रहरीं दोन वाजल्या नंतर स्वगृहीं जाण्यास परवानगी देणें ह्मणजे एका प्रकारची शिक्षाच आहे. लौकर उन्हांतून पायीं जाण्या पेक्षां सरकारी इमारतींची थंडी हवा बरी असें सर्वजण कबूल करितील. उन्हांचा खरा मारा दोन प्रहरा नंतर होत असतो ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्या सारखी आहे. सकाळीं आठ वाजण्या पूर्वी घड जेवण मिळणार नाहीं आणि भर उन्हांत घरीं लांब वर जाववणार नाहीं. अशा रितीनें यंदाच्या हुकुमामुळें लोकांचे फारच फार हाल होतील. सर्व प्रकार आह्मी विस्तारानें डेपुटी साहेबांपुढें मुद्दाम मांडला आहे. आणि त्याचा योग्य विचार करण्या इतका सूज्ञपणा दाखवून ते आपल्या पहिल्या हुकूमावरून तांबडी तिर्यक् रेषा ओढतील व लोकां। सुखावतील अशी आह्मांस बळकट आशा आहे.

## मुलकी नियम

( कमिशनद्वारां शहानिशा )

हल्लीं रा. रा. रुस्तुमजी फर्दूनजी साहेब डेपुटी कमिशनर व रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. ए० असि० कमिशनर या उभयतांकडे मुलकी कार्यमालेच्या नियमांचें परिचलन करण्यांचा उद्योग स्थानिक सरकारांन सोंपविला आहे. वऱ्हाडचा जो मुलकी कायदा प्रचलित आहे त्या संबंधानें वाटाघाट चालणार आहे अशी लोकांची समजूत झालेली दिसते पण ती चुकाची आहे. मध्यप्रांताचा मुलकी कायदा या प्रांताला लागूं करण्या सारखा नाहीं. व नागपुराकडे मालगुजारीची पद्धती चालते आणि इकडे रयतवारी चालते तेव्हां वस्तुतः दोन्ही पद्धती परस्परापासून पुष्कळशा भिन्न असल्यामुळें दोन्ही ठिकाणचा कायदा एक असण्याचा संभवच नाहीं. या प्रस्तुतच्या कमिशनाच्या उद्योगा संबंधानें असें सांगतात कीं नॉन–जुडिशिअल सरक्युलर्स ह्मणून एक निरनिराळ्या नियमांचा मोठाच ग्रंथ आहे. त्याच्या पांच भागांचीं वेगळीं पुस्तकें आहेत. या ग्रंथांत मुलकी कार्या संबंधाची सर्व माहिती संकलित केलेली आहे. वऱ्हाड प्रांताच्या अव्वल इंग्रजी अमला पासून मुलकी कामाची उभारणी कशी कशी होत गेली व यांत किती नानाविध विषयांचा समावेश होत आलेला आहे याची कल्पना या ग्रंथावरून चांगली होईल. या ग्रंथाचे परिचालन करावें, नव्या वस्तुस्थितीला अनुलक्षुन फेरफार करावे, व इतर उपयुक्त सुधारणा कराव्या या हेतूनें नवीन कमिशन बसविण्यांत आलें आहे. स्थानिक सरकारांची नुकतीच क्रांती झाली आहे आणि मध्यप्रांताशीं नवा संबंध जडला आहे हें फार उत्तम होय.

या चौकशीच्या कार्यावर जी मंत्री मंडळी नेमिली आहे तिच्या नामावळी वरूनच आह्मी ह्मणतों कीं ही नेमणूक अगदीं सर्वमान्य आहे. राजश्री रुस्तुमजी साहेब ह्मणजे वऱ्हाडच्या डिपुटी कमिशनरांमध्यें पहिल्या प्रतीचे अनुभवी, कर्तबगार, व मेहनती असे अधिकारि असल्यासंबंधानें आह्मी गेल्या मुलकी रिपोर्टाचीच साक्ष देतों. राजश्री भाऊसाहेब देशपांडे यांचाही लौकिक मुलकी कामासंबंधानें फार जुना आहे. हल्लींचा मुलकीचा कायदा प्रथम तयार झाला तेव्हां त्या समयीं त्यांच्याकडे त्या पैकीं पुष्कळसा कार्यभाग होता. त्याशिवाय ते स्वतांच वतनदार असल्यामुळें त्यांस मुलकीकडील पुष्कळ कच्ची माहिती आहे ते कच्चें काम करून नंतर पायरी पायरीनें या दर्ज्याला चढलेले आहेत. अशा अधिकारी द्वयानी नेमणूक झालेली पाहून आह्मांस मोठा आनंद वाटतो. त्याशिवाय या कामावर देखरेख मे. हेअर साहेब यांची राहील असें आह्मांस वाटतें. व असा प्रकार असल्यास दुधांत साखरच ! या शिवाय आह्मांस उमेद आहे कीं सध्यां वहिवाटींत ज्या अडचणी येतात त्यांचा देखील योग्य विचार होईल. साधरण रोजच्या अनुभवांतली गोष्ट ह्मटली ह्मणजे जहागीरदार, इनामदार, रुसुमदार वगैरेंच्या हका संबंधानें पुन्हां विचार व्हावयाला पाहिजे. त्या शिवाय जमिनीच्या वहितीच्या प्रकारांचें निरीक्षण होऊन हल्लीं जो जमिनीचा मालक एक व शेती वहित करणारा मजूर दुसरा असे दोन वर्ग बनत चालले आहेत त्याला प्रतिरोध करणारें कांहीं नियमन असावें असें आह्मांस वाटूं लागलें आहे. या प्रश्नाचा विचार या कमिशना पुढें होईल किंवा नाहीं हें आह्मांस ठाऊक नाहीं. कमिशनच्या कार्याची व्याप्ती किती आहे हें देखील लोकांस ठाऊक असण्याचा संभव नाहीं. आमचें स्थानिक सरकार या कमिशनाच्या उद्योगा संबंधानें लोकांस अंशतः जागृत करील तरी त्यापासून लोकांचा व सरकाराचाही फायदा होण्यासारखा आहे असें आह्मांस वाटतें.

## लोकमताची पृच्छा

वऱ्हाड मुलूख मध्यप्रांताला जोडल्यामुळें येथील व्यवस्थेंत कायकाय फेरबद्दल करावे लागतील याचा कच्चा तपशील निश्चित करण्यासाठीं रा. रा. क्रम्प साहेब व रुस्तुमजी साहेब यांचें एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. त्या कमिशनाची कामगिरी संपून त्या संबंधाचा रिपोर्ट स्थानिक सरकारापुढें सादर करण्यांतही आला असावा असें वाटतें. परंतु तत्संबंधीं माहिती लोकांस कळवून त्यांचा अभिप्राय मागविण्याची वहिवाट मध्यप्रांताच्या सरकारांत असावी असें वाटत नाहीं. या रिपोर्टावर जो कायमचा ठराव होणार असेल तो प्रसिद्ध होण्यापूर्वी त्या संबंधानें लोकांचा अभिप्राय विचारण्यांत येईल तर फार बरें असा आमचा समज आहे. विनंती करण्याचें काम आहे व तें आज आह्मीं केलें आहे. विनंतीला मान देण्याचा अधिकार सरकारचा आहे.

## शिक्षणाचें धोरण.

ज्ञानप्रकाशकारांनीं ह्मटल्याप्रमाणें लार्ड कर्झन यांचा नांगर या विद्यादानाच्या भूमींत अखेर फिरला हें नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या सरकारी ठरावानें सर्वांस विदित केलें आहे. लार्ड कर्झन सारखा महान् उद्योगी व महान् मुत्सदी विरळा आढळेल. नुकताच एक सुंदर निबंध ठरावरूपानें बाहेर आलेला आहे. इंग्रजी राज्यांतील विद्यादानाचा यांत इतिहास आहे. सरकारी ठरावांत सरकार विद्यादानाच्या महतीचें वर्णन करील, त्यांतील निर्दोषता सांगून सरकारी उदारबुद्धी विदित करील आणि सरकार यापुढें ज्या सुधारणा करणार आहे त्यामुळें विद्यादानाचें कार्यचक्र इंडियन राष्ट्राला नैतिक व आधिभौतिक संपदा आपोआप आणील असें ह्मटलें आहे. अशा विद्यामृतानें पावन होण्याचें काम इंडियनांचें आहे. आणि त्यांनीं ती संधी न दवडतां सरकाराला थोडें सहाय्य द्यावें असें सुचविलें

आहे. हा ठराव ह्मणजे भाषासौंदर्य, विचार गांभिर्य, वर्णनकौशल्य यांचा एक संकलित निबंधच आहे.

पण सर्व धोरण बादशाही आहे. लोकांच्या हातीं कांहींच सत्ता ठेवावयाची नाहीं असा संकेत दिसतो. खानगी शाळा सरकारी बंदोबस्ताखालीं आणण्याची मुख्य गोष्ट या ठरावानें निश्चित करून ठेविली आहे. विद्यादानाचें सर्व नियंत्रण सरकारानें हातीं पक्केपणीं घेतलें आहे. या ठरावात हीच मोठी गोम आहे कीं सर्व अष्टाधिकार सरकारच्या हातीं घेतील अशी योजना आहे. खानगी विद्यादानाच्या संस्था विशेषेंशानें हस्तगत करण्याचा विचार मुख्यतः दिसून येईल. या ठरावानें आजपर्यंतच्या विद्यादानाचें सिंहावलोकन करून भावी मार्ग निश्चित केला आहे, आणि त्यामुळेंच या ठरावांतील मुख्य धोरणा विषयीं मन फार साशंक होत आहे. युनिव्हरसिटीच्या बिलाचे सर्व सिद्धान्त या ठरावानें पुनरुक्त झाले आहेत. दोन्ही संबंधानें लोकमत अनेक बाबतींत विरुद्ध आहे पण त्याचा जोंपर्यंत आदरभावानें स्वीकार होत नाहीं तोंपर्यंत सरकार करील तीच पूर्वदिशा होय.

---

## दुखाचा झटका

हैदराबादचे निजाम साहेबांची स्वारी गेले दोन अडीच महिने पर्यंत मुंबईच्या समुद्र कांठची हवा खाऊन पुन्हां आपल्या राजधानीच्या नगरीं नुकतीच परत गेली निजाम साहेब इतकें दिवस आपलें राज्य सोडून मुंबईस जाऊन कां राहिले व तेथें त्यांनीं काय केलें या विषयीं दुसऱ्या प्रांतांतल्या लोकांपेक्षां आह्मां वऱ्हाड प्रजा जनांस अत्यंत आतुरता असणें साहजिक आहे. परंतु ही आपली उत्कंठा सफल होण्यास कांहींच मार्ग नाहीं ह्मणून वाईट वाटतें. मुंबईच्या मुक्कामीं त्यांच्या संबंधें लोकांच्या नजरेस आलेली गोष्ट ह्मणजे त्यांनीं पुष्कळसा पैसा खर्च करून टाकला हीच होय. त्यांनीं दोन लक्ष रुपयांचे घोडे घेतले व दहा लक्षापर्यंत जड जवाहीर खरेदी केलें. या शिवाय शर्यती, सर्कसीचे खेळ, नाटकें वगैरे गोष्टींत जवळ जवळ त्यांनीं ४० हजार रुपयांचा चक्का चूर केला आहे. वरील गोष्टी कडे पैसा खर्चण्याची कितपतशी नड होती हें आह्मांस समजत नाहीं. हैदराबादचें संस्थान फार मोठें व श्रीमान आहे. त्यांच्या सारख्यांनींच असा पैसा खर्च करावा हीहि गोष्ट बरोबर आहे थोरांच्या सर्वच गोष्टी थोर असतात अर्थात त्यांस नांवें ठेवणें ह्मणजे जरासें गैरच होईल.

परंतु निजाम साहेबांनीं आपला पैसा असा विनाकारण खर्चिला हें पाहून मनास फार वाईट वाटतें. संस्थानिकांनीं आपल्या संग्रही प्रजेच्या कल्याणासाठीं जितका पैसा जोडवेल तितका पैसा अनंत परिश्रमांनें जोडला पाहिजे- प्रजेकडून करभार घेऊन संचित केलेली धनदौलत खर्च करण्याचीं स्थलें निराळीं आहेत. ही दौलत चैनीच्या ऐषआरामांत नाहींशी करण्याची नव्हे. आपलें लक्ष्य राज्यकारभारांत घालून प्रजेच्या हिताहिताच्या गोष्टींचा नेहमीं विचार करणें हें राजा ह्मणवून घेणारांचें जगांतलें मुख्य कर्तव्य आहे. व त्यांच्या आयुष्याचें साफल्यहि ही इतिकर्तव्यता उत्कृष्टपणें करण्यांतच आहे. ही गोष्ट कोणत्याहि संस्थानिकानें विसरतां कामा नये.

गोऱ्या राज्यकर्त्या पुरुषांची पैशासंबंधीं दक्षता संस्थानिकानीं मुद्दाम शिकण्यासारखी आहे. लोभी मनुष्य आपला पैका प्राण गेला तरी विपंचत नाहीं त्याप्रमाणें ह्या गोरे लोकांच्या हातून महसा पैसा सुटणें महत्कर्म कठीण असतें. लांब कशाला ! निजाम सरकारासारखे अतिश्रेष्ट रजवाडे मुंबई सरकारच्या राजधानीस गेले ह्मणून मुंबई सरकारनें त्यांच्या पाहुणचारासाठीं कांहीं तरी खर्च केला आहे काय? त्याच्याच उलट, कोणी व्हाइसराय हैद्राबादेस गेले तर लक्षावधी रुपयांचा चुराडा होत असतो ही सर्वांच्या पक्या अनुभवांतलीच गोष्ट आहे. हीच गुरुकिल्ली आपल्या संस्थानिकांनीं जवळ करावी. आपल्या प्रजेच्या प्रत्यक्ष हिता खेरीज खजिन्याचें भंडारगृह कधींहि उघडें करूं नये. उदारपणा जो दाखवावयाचा तो आपल्या प्रजाकार्यार्थच दाखविण्याचा निश्चय करावा. या पेक्षां निराळे कामकाजांत पैका देण्यास कांकूं करण्याचा कंजूषपणाचा दोष घेण्यास सर्वथा तयारी ठेवावी. श्री लक्ष्मीस आपल्याच हस्तें दुसऱ्याच्या स्वाधीन करण्याच्या दुष्ट खोडीनेंच राज्यांचीं राज्यें गमावलीं आहेत. पैशाच्याच पायीं आपलें राज्य गहाणवट पडलें व पुढें तें आपल्या दौबल्या मुळें कायमचें आपणांस अंतरलें ह्या गोष्टीचें दुःखद स्मरण निदान निजाम सरकारास देण्याची आह्मा वऱ्हाडच्या प्रजाजनांस जरूर नाहीं. सोन्यासारखा वऱ्हाड प्रांत आपल्या हातून कसा अचूक नाहींसा झाला ही एकच गोष्ट खऱ्या राज्यकर्तृत्वाची अंतस्थ सार गोष्ट शिकवीत आहे.

ह्या उपदेशाकडे डोळे मिटून राजे रजवाडे मनः पूतं सुखसमुद्रांत डुंबत बसतील तर राजा हें उपपद त्यास ज्या गोष्टीमुळें प्राप्त झालें आहे तें राज्यच त्यांचें नाहींसें होईल. अस्तु. इत उत्तर तरी निजाम साहेबांनीं आणि तसेच इतर राजांनीं डोळ्यांत तेल घालून राहण्यास विसरूं नये हीच त्यांस सर्व प्रजाजनांची अंतःकरणापासून प्रार्थना आहे.

---

## रत्न परीक्षा

रत्नांची परीक्षा करणें ती एक रत्न पारखीच करूं शकणार आहे. ती इतरे जनांस साधावयाचीच नाहीं. रत्नांची पारख करणें हें काम फार कठीण आहे. ही एक कला आहे ही एक डोळ्याची विशेष नजर आहे. ती शिकून येण्यासारखी किंवा दुसऱ्यास शिकवितां येण्यासारखी गोष्ट नाहीं. ती नजर ज्याची बसेल त्याची बसेल आपण आपल्याच परीक्षेनें रत्न घेऊं ह्मटल्यास आपण चांगलेच फसूं. रत्नांचा दर्दी माणूस असेल त्याच्याच करवीं आपण रत्नांचा व्यवहार केला पाहिजे. रत्न पारखी नसला तर उत्कृष्ट रत्नें मातीमोल ठरतील. ह्मणून जें ह्मणतात कीं रत्नांचे परीक्षा करण्यास रत्नपारखीच असला पाहिजे, गांजरपारखी उपयोग नाहीं—तें अगदीं अक्षरशः खरें आहे.

आपला हिंदुस्थान देश सुवर्णभूमी ह्मणून पुरातन काळापासून नाणवलेला आहे. ह्या सुवर्णभूमींच्या पोटीं रत्नांच्या अनंत खाणीं आहेत. पण ह्या रत्नांना यूरोपचें थंड हवा पाणी चांगलें मानवूं लागल्यापासून हीं रत्नें आपणांस लाभेनातशीं झालीं आहेत ही गोष्ट वेगळी. पशु, पक्षी, रत्नें आदि करून गोष्टींची परीक्षा करण्याची विद्या आपल्या लोकांनीं चांगल्या पूर्णतेस पोहोंचविलेली आहे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. रत्न परीक्षे संबंधीं बरीच उपयुक्त माहिती आपल्या जुन्या संहितादि ग्रंथांतून उपलब्ध आहे.

कोणचीं रत्नें कोणी, केव्हां व कशी ल्यावीं, त्यांची जपणूक कशी करावी, व त्यांची इष्टाइष्ट फलें काय आहेत त्याची उत्पत्ति, आकार, जाती, रंग आयब ( दोष ) व त्यांची खऱ्या खोट्याची चाचणी, उपयोग, किंमती वगैरे बरीच चांगली माहिती रा. रा. हरि गोविंद विडकर मोतीवाले ( हे स्वतां रत्न पारखीच आहेत ) यांनीं आपल्या नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या रत्न परीक्षेच्या पुस्तकांत दिलेली आहे. हें पुस्तक वाचून मनुष्य चांगला रत्नपारखी बनेल असा भावार्थ मुळींच नाहीं. ग्रंथावरून किंवा शिकून हें ज्ञान येण्यासारखेंच नाहीं. असें ह्मटलें आहे कीं,

राग़ी, बाग़ी, पारखी, नाडी और ज्ञान ।
इस पंचनके गुरु है, लेकिन उपजत अंग स्वभाव ॥

तात्पर्य, हें पुस्तक मार्गदर्शक आहे. प्रसिद्ध नवरत्नांची सहज समजण्यासारखी व सांगतां येण्यासारखी सर्वसाधारणशी त्रोटक माहिती यांत चांगल्या रीतीनें संकलित केलेली आहे. ही माहिती ह्मणजे सर्व साधारण ज्ञान ( General knowledge ) ज्यास ह्मणतात त्याचा एक भाग आहे. अर्थात हें पुस्तक प्रत्येकानें आपल्या नजरे खालीं घालण्याचा विचार केल्यास वावगें होणार नाहीं.

या भवसागरांतून तरून जाण्यास श्री माया देवीनें पंच तत्रें निर्माण केलीं. मणी, मंत्र, ओषधी, योग आणि ज्ञान. मणी हे एक प्रकारचे दगड आहेत. पण हिरे, पांच वगैरे दगडास इतकी उच्च स्थिती प्राप्त झालेली पाहून मनास चमत्कार वाटतो. वरील पंच तंत्रांपैकीं मणी हें आद्य तंत्र होय. मणि या शब्दानें सर्व रत्नांचा समावेश होतो. मुख्य नवरत्नांचीं नांवेंहि पुष्कळांस माहीत नसतील, मग त्यांचें रम्य दर्शन तर दूरच राहिलें. श्रीराम ह्या गोड नामाचा उच्चार जसा मोहक, आनंददायक व मंगळ आहे तद्वत नव रत्नांचाहि नामोच्चार वाटणारा आहे ह्मणूनच आह्मी माणिक, हिरा, पांच, मोती, नीळ, पुष्पराग, पोंवळें, गोमेद व लसणिया असा नव रत्नांचा पाठ ह्मणून हें रत्नपरीक्षेचें नाजूक काम चतुर वाचकांकडेच सोपवूं.

---

## रासपंचाध्यायी

[ शिवकल्याणांची प्राकृत टीका ]

या ग्रंथा संबंधानें आह्मी पुष्कळ दिवस जाहिरात छापत होतो तेव्हां वाचकांचें लक्ष्य तिजकडे पूर्वींच गेलें आहे. हा ग्रंथ गेल्या वर्षीं प्रतिपदेच्या मुहूर्तावर प्रकाशित करण्यांत आला. अडीचशें पानांच्या मानानें याची किंमत १ रुपया जड वाटण्यासारखी नाहीं. प्रथमारंभीं श्रीकृष्णाची मूर्ती दिली आहे ती मोठी मोहक आहे. ग्रंथाचे प्रकाशक रा. रा. गणेश बळवंत मोडक बी. ए. यांनीं या कामीं चांगले परिश्रम केले आहेत. अलिकडे त्यांचा सर्व भर अध्यात्म विद्येकडे आहे. यांच्या बाह्य पेहरावा वरून मनुष्य पुष्कळदां फसतो पण परिचयाच्या अंतीं यांस कोणीही विशेष चाहतील. यांनीं ' सौराष्ट्र ' नांवाचा एक सुरस ग्रंथ लिहिलेला आहे. तसेंच ' नित्य नियम, ' ' ज्ञानगुटिका ' व ' पाप पुण्य ' असे तीन निबंध इतर देशी भाषेंतून महाराष्ट्र भाषेंत मार्मिकपणानें उतरले आहेत. सध्यां ते शिवकल्याणाच्या टीके सहित समग्र श्रीमद्भागवत छापण्याच्या विचारांत आहेत आणि ह्या त्यांच्या आवडत्या छंदाचाच ' रासपंचाध्यायी ' हा बहु आमोददायी गुलाबगुच्छ होय. आह्मी राजश्री मोडक यांचें अभिनंदन करितांना त्यांच्या गोड व तत्वदृष्टीच्या प्रस्तावने बद्दल विशेष तारीफ करितों. ही प्रस्तावना सप्रेम व सहृदय वाचकाला पुढील रासक्रीडेचें वर्णन वाचण्यासाठीं उत्कृष्ठ तात्विक दृष्टी देईल. रासक्रीडेचा विषय निंद्य मानण्याचा प्रवात इंग्रजी शिकलेल्या मंडळी मध्यें विशेष आहे. पण तो त्यांच्या अज्ञानाचा व उतावेळपणाचा परिणाम आहे असें राजश्री मोडक यांच्या प्रस्तावनें वरून चांगलें कळेल. विशेष मौज ही कीं राजश्री मोडक हें इंग्रजी विद्येमध्यें सर्व तऱ्हेनें चांगले रंगलेले आहेत. शिवकल्याणाची टीका किंवा भागवत कोणी न वाचले तरी चालेल, परंतु श्रीफळ हातीं उचलून अहेराचा स्वीकार करितात तसा स्वीकार दर्शविण्यासाठीं निदान या ग्रंथाची प्रस्तावना अवश्य वाचावी अशी आह्मी पुनः पुनः शिफारस करितों. कारण या सात पानांच्या प्रस्तावने मध्यें त्यांच्या बहुसाल वाचनाचा निष्कर्ष चांगला उतरला आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— उष्णतेचें मान फार प्रखर असून झपाट्यानें वाढत आहे. सध्यांच पारा १०२ अंशापर्यंत चढतो. या मानानें प्लेगाचा रोग लवकर नाहींसा होईल असा रंग आहे. इतर गोष्टींत सार्वजनिक आरोग्य समाधानकारक आहे.

( रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे डेक्कन कालेजाच्या वाढ दिवसाच्या दिवशीं ह्मणजे येत्या बुधवारीं त्या कालेजांत एक व्याख्यान देणार आहेत; आणि त्या कामा निमित्य त्यांची स्वारी पुण्याला गेली आहे. )

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥।- |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| जवारी ९०-९२ | जवस ८० |
| गहूं काठे ८० | धनशी ९० |
| सरकी | ६॥ |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | २॥ ते ३ रु. मण |
| तूप | ८॥ रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण |
| रुई जीन | ८२ |
| कापूस | ६७ |

**विलक्षण न्याय**— सातारा जिल्ह्या मध्यें एका निसाळलेल्या वाघानें लोकांच्या गुरांढोरांस उपद्रव करण्याचा सारखा क्रम चालविला होता. त्यांस दोन धनगरांनीं नुकतेंच मोठ्या शिताफीनें जंगलांत मारलें. पण या कृत्याबद्दल त्यास बक्षीस न मिळतां उलट परवानगीशिवाय जंगलांत शिकार केल्याबद्दल सातारा जिल्ह्याच्या एका माजिस्ट्रेटानें एकास पंधरा व दुसऱ्यास पांच रुपये या प्रमाणें दंड केला.

**साऱ्याची सक्ती**— भोरसंस्थानापैकीं रायगड तालुक्यांतील मौजे मेरवणें या गांवीं गेल्या ता० ९ रोजीं दुपारीं चार वाजण्याचे सुमारास गांवांतील लोक एका लग्नसमारंभांत गुंतले असतां "चार उंट, आठ घोडे, स्वाराचा एक रिसाला, बारा हुजूर सांगिनी पायदळ, चौदा पोलीस जवान व कांहीं इतर लोक मिळून सुमारे साठ पर्यंत सैन्य" फौजदार व हवालदार या अंमलदारांसुद्धां एकाएकीं येऊन धडकलें. त्यांनीं गांवास अर्धा वेढा दिला, आणि नंतर धराधरीस सुरुवात केली. चौकशी अंतीं लोकांस समजलें कीं त्या गांवची आजपर्यंतची थकलेली बाकी जबरदस्तीनें वसूल करावी असा पंतसाहेब यांचा हुकूम आहे. खरें असल्यास ही गोष्ट बरी नव्हे !

**स्वदेश प्रीति**—जर्मनी व अमेरिका यांतून विलायतेस मातीचीं भांडीं फार येऊं लागलीं व विलायती मातीच्या भांड्यांपेक्षां तीं स्वस्त पडूं लागली आहेत म्हणून तेथील लोकांत चळवळ उडाली आहे. या लोकांचा बाणा परदेशी माल वापरावयाचा नाहीं असा आहे. आपल्या इंडियन लोकांचा मात्र असा बाणा नसावा ना !

**वाघ सुटला**—गेल्या गुरुवारीं सकाळीं मुंबईच्या व्हिक्टोरिया गार्डनमधील पिंजऱ्यांत ठेवलेला वाघ बाहेर पडून इकडे तिकडे फिरूं लागला. त्यावेळीं त्यांस धरण्या करितां दोन इसम पुढें सरसावले, त्यापैकीं एकाच्या उजव्या मनगटास यानें चावून बरीच इजा केली. याप्रमाणें वाघास जीवंत पकडण्याचे सर्व यत्न निष्फळ झाल्यावर बागेंत येणाऱ्या लोकांस त्यापासून इजा होऊं नये म्हणून तेथील सुपरिंटेंडंट यांनीं त्यास गोळी घालून ठार मारिलें. इजा झालेल्या इसमास औषधोपचार चालू आहे.

**उरफाटें विघ्न**—पनवेल पासून तीन कोसांवर लोणवाडी म्हणून एक खेडें आहे. तेथें टोळधाड आली ती नाहींशी व्हावी म्हणून तेथील लोकांनीं आगट्या पेटविल्या व पुष्कळ धूर केला. तेथील घरें गवताचीं होतीं व वारा जोराचा सुटल्यामुळें घरें पेटून सर्व गांव जळून खाक झाला !

**चुट्टा ओढणारांस उपयोगी शोध.**— चुट्टा ओढतेवेळीं चुट्ट्याचे शेवटीं जी राख असते ती झाडूं नये म्हणजे चुट्टा ओढण्यांत एक प्रकारची खुमारी येते असें अनुभवास आल्यानें समजतें. आणि या राखेचा स्वाद तोंड मिटून नाकानें वर ओढून घेतला तर मस्तकशूळहि उतरतो म्हणतात. मुद्दाम अनुभव पाहावा.

चीफ माजिस्ट्रेट कोर्टांतून असा हुकूम बाहेर पडला आहे कीं, व्हाइसराय साहेबांची स्वारी रस्त्यावरून जात असतां पोलीसांनीं सलाम न करितां नीट उभें राहवें. व त्याप्रमाणें पोलीसांनीं इतर लोकांस करण्यास सक्त ताकीद द्यावी. खुद्द व्हाइसराय साहेब सलामाची मनाई करितात आणि इतरत्र एखादा गोरा वेडापीर सलाम न केल्याबद्दल दुसऱ्यांचा उपमर्द करतो. एकूण कुत्र्याचें शेपूट वाकडें तें वाकडेंच.

### ही गोष्ट खरी काय–

लार्ड कर्झन साहेब बंगाल प्रांतांतील मेमनसिंग संस्थानच्या महाराजांच्या विनंतीवरून मेमनसिंग येथें गेले होते. लाट साहेब स्टेशनवरून राजवाड्याकडे जात असतां, त्यांस पहावयास जमलेल्या लोकांपैकीं एकानेंही त्यांस सलाम केला नाहीं म्हणून त्यांस राग आला. हें पाहून त्या प्रांतांतील माजिस्ट्रेटानें मेमनसिंग असोसिएशन नांवाच्या संस्थेच्या सेक्रेटरीस विचारलें कीं लाट साहेबांस कोणीही सलाम करूं नये असें लोकांस तुम्ही सांगितलें होतें कीं काय? त्यावर सदर सेक्रेटरींनीं उत्तर दिलें कीं लाट साहेब येतील तेव्हां पोलिस अम्मलदारांनीं फक्त उभे उभे रहावें पण त्यांस सलाम करूं नये असा चौकीदारास हुकूम दिला होता, व चौकीदारांनींही लोकांस तशीच ताकीद दिली होती. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं ही गोष्ट लाट साहेबांचे कानावर घातली आहे. पण लाट साहेब असल्या गोष्टींचा राग धरतील असें आम्हांस मुळींच वाटत नाहीं.

**चमत्कारिक गृहस्थ**— वाशीम येथील प्रल्हादभट घाडगे नांवाच्या ब्राह्मणानें शिमग्याचे दिवशीं ९६ रुपयाच्या लालची करितां आपल्या हाताचीं बोटें तोडून घेतलीं.

**रावसाहेबांचा पांचजन्य** — धारवाड वृत्तकर्ते रावसाहेब अंताजी रामचंद्र जोगळेकर यांनीं शिमग्याचे मीमांसा करितांना सद्यस्थितीला अनुलक्षून असें प्रतिपादिलें आहे कीं, हिंदूंनींच काय पण इतर धर्मवाल्या इंडियनांनींहि आपल्या ऱ्हासाचा महाशंख इतक्या जोरानें वाजविला पाहिजे कीं, तो साता समुद्राच्या पलीकडील आपल्या राज्यकर्त्यांच्या कर्णरंध्रांत शिरेल. पण रावसाहेब हे विसरतात कीं, बहिरे बनलेल्या राज्यकर्त्यांपुढें पांचजन्याचा उपयोग तो कसला! असो. सर्वांनीं शिमगा सोडून बरोबर दिवाळी दसरा होईल या तरतुदीला लागावें हें बरें.

**आंड्यांचा वर्षाव**— मि० लॉईड जार्ज पार्लमेंटचे मेंबर, हे सेंट आल्बन येथें लिबरल पक्षा तर्फे कांहीं व्याख्यान देत असतांना श्रोतृसमाज चिथरून गेला जिकडून तिकडून आंड्यांची वृष्टि होऊं लागली लॉईड साहेब टांग्यांत बसून रेल्वे स्टेशन कडे निघाले पण मंडळींनें टांगाच उचलून उलथून देण्याचा प्रयत्न केला पण घोडे बुजाले म्हणून तो साधला नाहीं. आंड्यांचा वर्षाव सुरूच होता. एकदाचें यांनीं कसें बसें स्टेशन गाठलें. सुधारलेल्या राष्ट्रांतील हा प्रकार!

**हिंसाचार रती न रती**– मद्रास येथें

म्हैसूर संस्थानाला भरावी लागते. गतसालीं म्हैसूरकराकडून रकम यावयाची ती आली. त्या रकमेंत रुपये, आणे, पै होत्या. रुपये आणे पाठवून फक्त दोन पै म्हैसूरसरकारास पाठवितां आल्या नाहींत म्हणून पाठविणें राहिले. अकौंटंट जनरलच्या कचेरींत म्हैसूरसरकारांकडे देणें दोन पै निघाले व तें वसूल करण्यासाठीं एक लेखी यादी अर्धा आणा टिकीट लावून पाठविण्यांत आली. सार्वभौम सरकाराचा हा चोख कंजूषपणा पाहून म्हैसूर दरबारानें त्या दोन पै रेसिडेंटाच्या खजिन्यांत भरणा केल्या. हिशोब म्हटला म्हणजे असाच चोख पाहिजे.

**पोष्टाचें विचित्र खांब**— ऑस्ट्रेलियाचे पोष्ट खात्यानें नवीन तऱ्हेचे पत्र टाकण्याचे खांब उपयोगांत आणले आहेत. जर एखाद्या माणसास पत्रास टिकीट लावण्यास मिळाले नाहीं, तर त्यानें खांबाच्या एका भोंकांत पत्र टाकावें व दुसऱ्यांत एक आणा टाकावा म्हणजे पत्रावर "एक आणा टिकिटीचा दिला" अशी अक्षरें उठतात.

**चमत्कार**– कानडा प्रांतांत एक विहीर खणली. तिच्यांतून पाणी न येतां कारंज्या सारखा नुसता वाळूचाच झोत येत आहे ! हा झोत कोणत्या शक्तीमुळें वर येतो तें कारण अद्याप सांपडलें नाहीं. ( २ ) न्यूगिनीमधील एका विहिरीच्या पाण्यांत लोखंड किंवा पोलाद याची केलेली कोणतीही वस्तु बुडविली कीं, तिच्या अंगीं लोहचुंबकाची शक्ति येते?

**भयंकर टोळधाड**— ता० २०।२१ फेब्रुवारी रोजीचे सुमारास सातारा शहरावरून टोळांचा फारच मोठा थवा पूर्वेकडून पश्चिमेकडे गेला. शनवारी रात्रीं ते झाडावर व पिकावर बसले. सकाळीं पाहतात तों कोठेंही हिरवें पान दिसेना! रस्त्याच्या कडेचे मोठमोठे आंबा, बाभूळ, वड हे वृक्ष नुसत्या त्यांच्या भारानेंच कडाकड मोडून व कांहीं मुळासकट उलथून पडले; व स्टेशन कडे जाणारा रस्ता बंद झाला! हा थवा ४ मैल लांब १॥ मैल रुंद होता! या थव्यानें खालीं अगदीं सावली पडली होती. एकानें गणित करून असें काढलें आहे कीं, त्यांचा आंकडा महापद्म पर्यंत जाईल! व त्या सर्वांचें वजन २०९१ लक्ष हजार टन होईल म्हणजे ते सर्व वाहून नेण्याचें म्हटलें तर १४ टन ओझ्याचा एक डबा, अशा ५० डब्यांच्या ८००० गाड्या जी. आय. पी. च्या लागतील !

**आख्यायिका**—एकदां जपानचे राजे साहेबांची स्वारी सहेलकरीता सहल करीत असतां एका पक्ष्यानें झांप घालून एक मासा आपल्या पायांत धरून वर भरारी मारली त्याला पाहून राजे साहेबांनीं आपल्या एका तिरंदाजाला सांगितलें कीं तो पहा एक पक्षी पायांत मासा धरून उडत चालला आहे, तर तूं अशा शिताफीनें बाण मार कीं तो मासाहि न मरावा व पक्षीहि न मरावा पण मासा तर त्याच्या पायांतून सुटून पाण्यांत पडावा. राजाज्ञे प्रमाणें त्या तिरंदाजानें नेम धरून आकर्ण धनुष्य ओढलें व बाण सोडला तो निमिषार्धांत तो मासा पाण्यांत पडून पोहूं लागला व पक्षीही भरारी मारून निघून गेला. राजे साहेब खुष झाले व त्यास बक्षीस दिलें.

### महा तोफेचें नागपुरास आगमन

असीरगडच्या किल्ल्यांत असलेली एक सुमारें अडीचशे वर्षांपूर्वीची औरंगजेब बादशहाच्या वेळची तोफ नागपूर येथील चीफ कमिशनर साहेबांच्या रेसिडेन्सीवर ठेवण्यासाठीं सरकारानें नागपुरास नेली आहे. सदरची तोफ तांब्याची असून तिची लांबी साडे आठ हात आहे. तिचें वजन १८ टन म्हणजे जवळ जवळ तीनहजार मण आहे. तिच्या तोंडाचा व्यास छिद्राचे किनारीं सव्वा वीत असून संबंध तोंडाचा व्यास दोन विती म्हणजे एक हात आहे. तोंडावरील भागावर वेलपत्तीची नक्षी कोरली असून सर्व लेखही उठवीत आणलेले आहेत. मागील तोंडाचा व्यास दीड हात आहे. मागील तोंडास हत्तीचे तोंडाचा आकार आणला असून तोफेच्या वरील बाजूस दोन सिंह कोरले आहेत. तोफेच्या तोंडावर उर्दू भाषेतील एक शायर लिहिला आहे. त्याचा अर्थ माझे 'पोटांत इतक्या ज्वाळा आहेत कीं, त्यांनें काय अनर्थ होतील हें सांगतां येत नाहीं.' असा आहे. वरील बाजूस जंबर महंमद अमर हुसेन अरब या गोलंदाजाचें नांव आहे. याच लेखांत मुसलमानी शक १०७४ सालीं बऱ्हाणपुरास ही तोफ झाल्याचें लिहिलें असून हिचें नांव "हैबत प्रूफ" अथवा मुलूख दणाणून टाकणारी असें लिहिलें आहे तोफेचें सबंध काम मोठें सुरेख झालें असून अडीचशे वर्षांपूर्वीच्या कारागिरीची ती साक्ष देऊन थक्क करून सोडीत आहे.

**स्तुत्य देणगी**– मुंबई येथील दोन जैन गृहस्थ रा. सा. वसनजी त्रिकमजी जे. पी. आणि शेट हेतशी खिआशी या प्रत्येकानीं पालिटाणा येथील जैन विद्यार्थीवसति विद्यालयाच्या मदती करितां ५०।५० हजार रुपये दिल्याचें ऐकून प्रत्येक जैनास काय पण सर्व हिंदूंस आनंद वाटेल. सदर विद्यालय सुमारें १ वर्षापूर्वी मुंबई येथील कांहीं परोपकारी जैन गृहस्थांच्या खटपटीनें स्थापन झालेलें असून तेथें जैन विद्यार्थ्यांस धार्मिक शिक्षण व अन्नवस्त्र मोफत देण्याची तजवीज केलेली आहे. परंतु सदर विद्यालय असेंच कायमपणें चालविण्याकरितां रक्कम त्यांच्या व्यवस्थापकापाशीं नव्हती, ती नड या उदार देणग्यांनीं दूर झाली आहे.

यंदा एकंदर ३० हजार रुपयांची रक्कम मक्केस जाणारे गरीब यात्रेकरूंच्या मदती करितां निझाम साहेबांनीं मोठ्या उदारपणानें दिल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें आहे.

### कागदाचें देवालय

नार्वे देशांत बर्गेन गांवीं एक देऊळ आहे, तें सगळें कागदाचें केलेलें आहे. व त्यावर पाऊस पाणी पडून खराब होऊं नये म्हणून आंतून बाहेरून त्याला चुना, दहीं, व अंड्याचा बलक यांचा लेप दिला आहे. याच्या सभामंडपांत सुमारें १०००

आगाऊ वर्गणी
वऱ्हाडांतील ठिकाणीं......१ ८
बाहेरगांवीं टपालहाशिलांसह........ २ ८
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास..................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ८० १
दर ओळीस........८१ ८६
दुसरे खेपेस.... ......८१

REGISTERED No. N.

RATES OF SUBSCRIPTION
Town ... ... ... ... 1
Mofussil ... ... ... 2 ( With postage )
All Subscriptions to be paid in advance.
Single copy ..................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......8 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 28 MARCH 1904 NO 12

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २८ माहे मार्च सन १९०४ इ० अंक १२

### नोटीस

जनरल कमिटी ठराव नंबर १२ ता १४ मार्च १९०४ वरून जाहीर करण्यांत येते कीं, महाराजी आकोला खाली दिलेल्या सार्वजनिक विहिरींवर पाणी भरण्याची अगर कोणत्याही प्रकारें वापर ठेवण्याची सक्त मनाई आहे. कचेरी ता० २३।३।०४ इ०

W. L. Chipionkar.
सेक्रेटरी.
म्यु० क० आकोला.

### ताजनापेठेंतील सार्वजनिक विहिरींची यादी.

१ रा. गोपाळ खुशाल यांचे घरासमोर.
२ रा. सखाराम टिक्के यांचे घरासमोर,
३ रा. मनुगाडे यांचे घरांत.
४ मे० डे० कमिशनर साहेब यांचे कचेरींत.
५ हायस्कुल कंपौंड ( विहिरी २ )
६ टॅपल गार्डनमध्यें ( विहिरी ५ )
७ पार्कमध्यें.
८ पोलिस म्यागझीन जवळ.
९ मौशी अबदुलकादर यांचे घरासमोर.
१० मे. नहेरला यांचे घरासमोर सर्कार बंगल्या जवळ.
११ लाल बंगल्यामागें सडकेवर.
१२ छोटे मशिदीजवळ.
१३ मोमिन पुऱ्यांत हिरू धोबीचे घरा-यांचे समोर.
१४ मोमिनच्या मशिदीसमोर.
१५ मोमिन पुऱ्यांत डेपुटी महंमद हुसेन घराजवळ.
१६ गयकसाई याचे दुकानासमोर.
१७ जोगडी बाजारांत तेल्या चे घरा मागें.
१८ लायब्ररींतील विहिर.
१९ मोठे पुलाजवळ तळ्यांत.
२० पडावांतील विहिर.
२१ कसाई पुऱ्याच्या तळ्यांत.
२२ महादेवाचे देवळ जवळ.
२३ आकोट सडकेची खारी विहिर.

### आकोले शहरांतील सार्वजनिक विहिरींची यादी.

१ मोठे महारवाड्यांतील विहिर.
२ डाबकी रस्त्यांतील विहिर.
३ लहान महारवाड्यांत.
४ जोहरी पुऱ्यांत.
५ रंगारी पुऱ्यांत बापुन्या हजामाचे घरासमोर.
६ नबाबपुऱ्यांत.
७ नबाबपुऱ्यांत शेखचांदचे घरासमोर.
८ अक्कलकोट गंजाचे वेशीजवळ.
९ अक्कलकोटांत उदासीबोवाचे मठांत
१० देडपुऱ्यांत.
११ लोहार पुऱ्यांत साधुबुवाची विहिर
१२ अगरवेशी जवळ नदीचे काठीं
१३ काळ्या मारोती जवळ.
१४ सिताराम धोंड्याचे घरासमोर.
१५ नायकवाडी पुऱ्यांत गोसाव्याची मढी आहे तेथें.
१६ नायकवाडी पुऱ्यांत हिरामण कुंभाराचे घरासमोर.
१७ मुकुंदलाल आगरवाल्याच्या घरासमोर,
१८ गंजाचे वेशीजवळ जानकीबाई गोसावणीचे घरासमोर.
१९ ढोपणपुऱ्यांत राजाराम गुरवाचे घरासमोर.
२० माणकेश्वराचे देवळा जवळ रा. पडंरीनाथ रंगोलीकर यांचे वाडींत.
२१ ढोपणपुऱ्यांत पुंनाजी कुणबी याचे घरासमोर.
२२ डाबकी रस्त्यावर नारायण माळी याचे घरा मागें.
२३ रा. रा. मोतीलाल बनसीलालचे नवे हवेली जवळ.
२४ ,, गोपाळभट भुते याचे घरासमोर.
२५ ,, शिवाजी हिरामण कुणबीचे घराजवळ
२६ ,, सुंदरलाल बुलाखीलालचे घरासमोर.
२७ ,, भाऊराव नरसिंगराव याचे घरासमोर
२८ ,, हरीभाऊ काळे यांचे घरापाठीं तळेकराचे घराजवळ.
२९ ,, दमोधर वामन उदगीरकर यांचे घरामागें
३० ,, कृष्णाजी दिनकराचे वाडी मागें निंबेखालीं.
३१ ,, नथुराम नारायणराव याचे घरासमोर.

### नोटीस

रा. रा. मोतिलाल सदाराम मारवाडी दुकान बोरगांव वैराळ तालुके बाळापूर जिल्हा आकोला— यांसः—

खालीं सही करणार यानकडून कळविण्यात येतें कीं तुम्ही व आम्ही सख्खे बंधु आहोंत तुमचे व माझे दरम्यान आपले स्वसंपादित जिनगीचे हिशोबाबद्दल तारीख १ आगस्ट १९०३ इसवी रोजीं फारकती लेखही झाला आहे. परंतु आपले दुकानांत जी जमीन पट्ट्यानें वहितीस आहे तिजबद्दलचा खुलासा फारकतींत केला नाहीं. तुमचे व आमचे दरम्यान तोंडी करार असा ठरला होता कीं सदर्हू पट्टे तमचे नावचे असून त्याची भरणे राहिलेली पिकें यानबद्दल दरसाल जें उत्पन्न होईल त्यांतील स्वामीत्वाची रकम शेत करण्यास देऊन जो भाग राहील त्या भागापैकीं तीन हिस्से तुम्ही घेऊन $\frac{1}{4}$ हिस्सा मला द्यावा. या प्रमाणें तुम्ही चालू सालचा भाग मला दिला नाहीं व मी मागत असतां तुम्ही देत नाहीं. करितां तुम्हांस या नोटिशीनें कळवितो कीं नोटीस पोहचल्या पासून आठ दिवसांचे आंत पट्ट्याचे जमिनी बद्दलचें उत्पन्न मला $\frac{1}{4}$ हिशाचे द्यावे व मला पटून पावती घ्यावी असे न केल्यास अशी रीती प्रमाण तजवीज करून कोर्ट मार्फत आमचे हिशाचे उत्पन्न पट्ट्यांचे भरून घेऊं मग तुमची तक्रार ऐकणार नाहीं. दुसर तुम्ही आम्हास जमिनीचे पैसे दान फारकतींत लिहिल्या प्रमाणें दिली आहेत. ती आम्हास पैसे पत्र प्रमाणें जवारी खंडी २० वीस ठरल्या प्रमाणें द्यावी. कपटांत कमी भरल्यास तुम्ही वीस खंडीची भाती करून द्यावी, किंवा जास्त भरल्यास तुम्ही घ्यावी. याचा ही निकाल वरील मुदतींत करावा. तसे न झाल्यास रीती प्रमाणें तजवीज करून जवारी खंडी २० वीस भरून घेऊं. जवारी खराब झाल्यास घेणार नाहीं. करितां लौकर निकाल व्हावा म्हणून अगाऊ सूचना केली आहे. कळावे, तारीख २५।३।०४ इ०

सही
रघुनाथदास सदाराम राहणार
बोरगांव वैराळ तालुके
बाळापुर दस्तुर खुद्द.

### जमिनीचे गुणधर्म

जमिनींत चुना जास्त असल्यास तिची शाडवट जमिनींत गणना होते. अशा जमिनी बहुत करून टिकाऊ असतात. परंतु चुना जर प्रमाणापेक्षां जास्त असला तर तो अपायकारक होऊन पिकें चांगलीं येत नाहींत.

जमिनीचे रंग अनेक असतात. कांहीं काळ्या रंगाच्या तर कांहीं तांबड्या रंगाच्या व कित्येक पिवळसर असतात. परंतु त्याचा पिकाऊपणा रंगावर अवलंबून नाहीं म्हणून त्यांचे गुणधर्म चांगले लक्षांत ठेवले पाहिजेत. निरनिराळ्या जमिनींचे गुणधर्म खालीं लिहिले आहेत ते जर प्रत्येकानें लक्षांत ठेवले तर अमूक एक जमीन कोणत्या प्रकारची आहे हें नुसत्या नजरेनें हात लावल्या बरोबर त्याच्यानें सांगता येते.

चिकणमातीचे गुणधर्म—निवळ चिकणी माती हातास मऊ लागते, ती चिकट असते ओली असली म्हणजे तिला वाटेल तो आकार देता येतो, व वाळली म्हणजे ती भुसभुशीत व पिठाळ होते. निवळ माती ही शेतीच्या कामास अगदीं निरुपयोगी असते व ती अनेक रंगाची असते. सेंद्रिय अंश जर फार असला तर तिला काळा रंग येतो. लोखंड असल्यास तिचा रंग तांबूस होतो. वाळूपेक्षां चिकणमातीचें वजन पुष्कळ कमी असते. एका मापांत चिकण मातीचें वजन केलें व तेंच माप पुन्हां वाळूनें भरून त्याचें वजन केलें तर आपणास दोहोंतील फरक दिसून येईल. असें असून चिकणमातीस भारी अथवा जड म्हणतात कारण त्यांतून नांगर व शेतीचीं इतर औतें चालविण्यास त्रास पडतो. उन्हाळ्यांत ह्या जमिनी कठिण होतात व त्यांत अनेक भेगा पडतात, पण त्याच पावसाळ्यांत पाण्यानें भिजल्या म्हणजे चिकचिकीत होऊन त्यांजवर चालताही येत नाहीं. या जमिनी खालील बाबतींत चांगल्या असतातः—

(१) वनस्पती पोषणाला जीं द्रव्यें अवश्य लागतात तीं या जमिनींत विपुल असतात.

(२) ह्यांच्या पोटांत पावसाचें——अगर पाटाचें पावसाचें पाणी पुष्कळ वेळ राहतें शिवाय ह्या जमिनी हवेंतील आर्द्रता शोषून घेतात.

(३) अशा जमिनींत खतें घातलीं असता तीं वाहून न जातां पुष्कळ दिवस टिकतात.

(४) चिकण मातीच्या जमिनींत झाडांचीं मुळें फार घट्ट बसतात त्यामुळें वादळाचा वारा जरी सुटला तरी तीं उपटून पडत नाहींत,

परंतु खालील दोष त्यांचे अंगीं आहेत—

(१) अशा जमिनींत लागवड करण्याची असल्यास तीस फार खर्च व मेहनत पडते. कारण पावसाळ्यांत पावसानें जमीन भिजलेली असली म्हणजे तिचे गोळेच्यागोळे शेतीच्या अवजारांना चिकटतात व यामुळें नांगर वगैरे ओढण्यास फार त्रास पडतो. आणि एकदां ती वाळली म्हणजे इतकी कठीण होते कीं त्यांतून नांगरच चालत नाहीं.

( २ ) अगदीं थोडा जरी पाऊस पडला तरी त्यानंतर कित्येक दिवस पर्यंत शेतीचा काम धंदा बंद पडतो.

( ३ ) त्यांच्यांतून पाणी लवकर मुरत नाहीं त्यामुळें एखादा मोठा पाऊस पडला व सर्व जमीन सखल असली तर तेंत सर्व पाणी सांचतें किंवा उथळ असल्यास सर्व पाणी वाहावयास लागून त्याबरोबर जमिनींतील पुष्कळ द्रव्यें सुद्धां वाहून जातात. त्यामुळें जमिनीस फार अपाय होतो.

( ४ ) अगदीं चिकण मातीच्या जमिनीला पाटाचें पाणी देऊं नये. दिलेंच तर फार माफक व व्यवस्थेनें द्यावें. कारण अशा जमिनींतून पाणी झिरपत नाहीं तेव्हां विनाकारण ज्यास्त पाणी दिल्यास तें जमिनींत सांचून सर्व क्षार वरच्या पृष्ठभागावर येतात व ती शेतीस निरुपयोगी होण्याचा संभव असतो.

वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुद्ध १२ शके १८२६

मोठ्या राष्ट्रांचे आदा व व्यय हे फार बोधप्रद असतात. कोट्यावधी आंकड्यांची घडामोड कल्पनेला नीटशी कळत नाहीं परंतु तेच आंकडे आपल्या राष्ट्राच्या आद्याचे व व्ययाचे असले ह्मणजे त्या नाना संख्यामध्यें एकदम विलक्षण सत्ता उत्पन्न होते शाळेंत जेव्हां विद्यार्थी लक्षावधी व कोट्यावधी आंकड्यांच्या बेरजा, गुणाकार व भागाकार करितात तेव्हां त्यांस तो मोठा शीण वाटतो, परंतु हेंच अंकगणित त्यांस इंडियाच्या जमाखर्चाच्या आंकड्यावरून शिकविलें तर त्यांस त्या त्या अंकाच्या प्रक्रियेंत विलक्षण बोधशक्ती आहे असें कळून येईल. इंडियन राष्ट्राचा जमाखर्च ह्मणजे एक प्रचंड गणितच आहे. एवढा आदा व व्यय तुलण्यासाठीं पुष्कळशीं धनाढ्य राष्ट्रें एकत्र करावीं लागतील.

१९०४–०५ या सालीं इंडियाचें उत्पन्न किती होईल व खर्च किती होईल याचा अंदाज काढला आहे त्यावरून असें कळतें कीं इंडियाचें एकंदर उत्पन्न १ अब्ज २० कोटी ६२ लक्ष, २९ हजार रुपये आहे. या पैकीं निव्वळ काळ्या जमिनीच्या बाबीचें उत्पन्न जवळ जवळ एक चतुर्थांश ह्मणजे २९ कोटी ३८ लक्ष, ७४ हजार रुपये आहे. या उत्पन्ना खालोखाल दुसऱ्या मोठ्या उत्पन्नाच्या बाबी ह्मणजे मीठ व अबकारी या दोन आहेत. या प्रत्येकी साडे सात आठ कोटी पर्यंतच्या संख्येला येऊन मिळतात. यावरून मिठाचें उत्पन्न किती दांडगें आहे हें समजेल. अफूचें उत्पन्नही अगदीं तितकेंच ह्मणजे साडेसात कोटीचें आहे. करटम खातें व स्टांप खातें हीं अनुक्रमें सहा सहा कोटी रुपये पर्यंत सरकाराला उत्पन्न देतात. या शिवाय इनकम ट्याक्स व जंगल हीं दोन दोन कोटी रुपये उत्पन्नाचीं आहेत.

खर्चाचा एकवट आकडा १ अब्ज १८ कोटी ८४ लक्ष ४८ हजार ५०० रुपये आहे. मुख्य खर्चाच्या बाबी दोन. १ ली बाब लष्कराची होय. या खात्याकडे जवळ जवळ ३० कोटी रुपये खर्च होतात. एकंदर खर्चाचा एक चतुर्थांश लष्कराकडे जातो. हा खर्च अवाढव्य आहे आणि एवढा खर्च इंडियाच्या खजिन्यांतून व्हावा हें युक्तीला नीट दिसत नाहीं पण राजाच्या मर्जीपुढें प्रजेचें काय चालणार आहे! त्याच्या खालोखाल खर्च सिव्हिल राज्यकारभाराचा आहे हा खर्च १९ कोटी रुपये पर्यंत वाढलेला आहे. या संख्येमध्यें फक्त न्यायखातें, पोलीस, विद्याखातें, दवाखाना, राजकीय खातें इत्यादि सर्व कारभारांच्या खर्चाचा समावेश होतो. उत्पन्नाच्या बाबीमध्यें जमिनीचा महसूल, मीठ, अबकारी, अफू इत्यादि उत्पन्नाच्या कामधेनूंचा उल्लेख केला आहे; त्यांचा एकूण आदा ७२ कोटी रुपयांचा आहे पण एवढी रकम वसूल करण्यासाठीं जो आमला ठेवावा लागतो त्याचा खर्च उत्पन्नाच्या एक षष्टांशाहून थोडा अधीक ह्मणजे १३ कोटी रुपया पर्यंत येतो. रेल्वेकडे खर्च ३२ कोटी रुपये होतो पण उत्पन्नाचा आंकडा जमेला धरतां सरकाराला निव्वळ नफा फक्त ९९ लक्ष रुपयांचा आहे. येथें प्रमाणें ठळक ठळक बाबींचे आंकडे दिले आहेत. पुढील सालच्या अंदाज्यावरून एकंदरीनें असें दिसतें कीं उत्पन्नांतून खर्च वजा जातां साल अखेरीला १ कोटी ३७ लक्ष ८० हजार ५०० रुपये सरकारी तिजोरींत शिल्लक राहातें. अब्जापर्यंतच्या संख्येपर्यंत वाढलेल्या जमाखर्चाचा आढावा असें सांगेल कीं, इंडियन सरकार आपल्या खजिन्यासंबंधानें समाधानकारक स्थितींत आहे.

## सांपत्तिक स्थिती

इंडियन सरकारच्या खजिन्याची समाधानकारक स्थिती पाहून प्रजेची सांपत्तिक स्थिती देखील संतोषकारक आहे असें अनुमान सरकारी फडणीस दरसाल काढीत असतात. त्या परिपाठाला अनुसरून नामदार फडणीस लॉ साहेब यांनींही सद्यः स्थिती विषयीं आपला आनंद प्रदर्शित करून सरकारी उत्कृष्ठ राज्यकारभाराचें स्तुतीस्तोत्र गाईला आहे. ते लिहितात कीं आमचे जमाखर्च व हिशोबी तक्ते हीं इंडियाच्या सांपत्तिक उन्नती विषयीं साक्ष देतात. हा देश दुष्काळाच्या विक्राळ जभड्यांतून सुटला इतकेंच नाहीं तर गेल्या दोन वर्षाच्या पिकांच्या आबादानीमुळें सर्वत्र धनधान्यसमृद्धि विलक्षण झाली आहे. तत्रापि दुष्काळाची नुकसानी सर्वथैव भरून आली आहे असें ह्मणतां येत नाहीं व मुख्यतः गोधनाची उणीव अजून भरून यावयाची आहे. वरील अभिप्रायाच्या समर्थनार्थ नामदार लॉ साहेब ही गोष्ट प्रतिपादितात कीं मीठ, स्टांप, अबकारी, करटम, व पोस्ट आफिस या उत्पन्नाच्या बाबी सालोसाल सारख्या वाढत्या आहेत. हा वाढवा ह्मणजे सांपत्तिक समृद्धीचा आरसाच आहे. या उत्पन्नाच्या वाढीमध्यें देशाची सांपत्तिक उन्नतीचीं मुख्य लक्षणें दिसून येतात. वरील ह्मणण्याचा भावार्थ असा कीं, लोक मीठ अधिकाधीक खातात, अबकारी कडील पेयांचा व खाद्यांचा उपभोग सुखवृत्तीनें घेतात, बाह्य राष्ट्रीय माल पुष्कळसा विकत घेतात व दळणवळणाची अभिवृद्धी होत आहे या गोष्टी लोकांच्या सुखसमृद्धीचें दर्शन देतात. तसेंच पोस्टल ब्यांकेंत व इतर सरकारी ब्यांकांतून लोकांच्या ठेवींच्या रकमा अतिशय वाढल्या आहेत. ही गोष्ट लोकां जवळ अधीक पैसा जमल्या शिवाय होणारी नाहीं. गेल्या चार वर्षाच्या ठेवींचे आंकडे २८ कोटी रुपया पासून ३०, ३३॥, ३८, व ४०॥ कोटी पर्यंत वाढले गेले आहेत. या शिवाय इंडियाच्या फडणविसांनीं देशांतील निरनिराळ्या धंद्यांची व निरनिराळ्या व्यापारांची मीमांसा करून शेवटीं असें ह्मटलें आहे कीं, इंडियन रयत ही खालावत चालली आहे असें जे ह्मणतात तें अगदीं चुकीचें आहे. हा देश उत्तरोत्तर अधीक संपन्न होत आहे असें त्यांचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे. तथापि ते कबूल करितात कीं शेती व तत्संबंधीं कच्च्या मालाचे कारखाने या संबंधानें अधिकाधिक सुधारणा होत गेली पाहिजे आणि ती सुधारणा होऊं लागली ह्मणजे इतर राष्ट्रांच्या प्रतिबंधक जकातीच्या कायद्यांना दूर सारणारे निरनिराळे प्रतिबंध इंडियांतहि चालूं करितां येतील. त्यांच्या अभिप्रायाच्या मजबुतीचा दुसरा एक बुरूज ह्मटला ह्मणजे इंडियांत सालोसाल येणाऱ्या सोन्याच्या व रुप्याच्या वाढीचें प्रचंड प्रमाण होय. गेल्या ६८ वर्षाचे आकडे एके ठिकाणीं करून त्यांनीं अशी तुलना काढली आहे कीं, १८३५–३६ पासूनच्या पहिल्या दशकामध्यें सरासरी २३ कोट रुपयांची सोनें चांदी इंडियांत आली. तीच सोनेंचांदी १८८५ पासूनच्या शेवटल्या दशकांत जवळ जवळ ४॥ पट ह्मणजे १०९ कोटी पर्यंत येऊन पोहोंचली आहे. आणि आज पर्यंत ६८ वर्षांमध्यें आलेल्या सोन्या चांदीची किंमत ६ अब्ज २२ कोटी रुपये आहे. हे आकडे देऊन नामदार साहेब ह्मणतात कीं, इतकीहि अब्जावधी रुपयांची संपदा इंडियांत रिचली गेली आहे तर हा देश भिकारी होत चालला आहे ही गोष्ट संभवेल तरी कशी!

## परंतु

आमची भाग्यसंपदा आह्मांस किती फसविते व राज्यकर्त्यांना किती घनांध करित हें मोठें अद्भुत होय. आमच्या लोकांची वस्तुस्थिती पाहण्यासाठीं वरील आकड्यांचें अवडंबर नको आहे किंवा नामदार लॉर्ड साहेबांची फडणविशीही नको आहे. एखाद्या सामान्य माणसाच्या घरीं चला आणि तेथील गृहस्थिती वरवरही पहा ह्मणजे देखील ती दारिद्र्यावस्था पाहून डोळ्यांतून अश्रु गळतील. गरिबीमध्यें मोठें दुर्भाग्य ह्मणजे लोकांस त्या माणसाच्या श्रीमंती विषयीं वास येत असावा आणि त्यानें तर ती श्रीमंती बाह्यतः दाखविण्यासाठीं प्रयत्न करावा! इंडिया सरकार कांहींहि ह्मणोत त्यांच्या शाब्दिक श्रीमंतीनें आमची गरिबी मात्र दुणावत आहे.

## रणसंग्राम

सध्यां रणसंग्रामाच्या बातम्या फारशा नसतात; त्यामुळें लढाईला शिथिलता आली आहे असें मात्र कोणी समजूं नये. ही लढाई समुद्रावरची मुख्यतः असून छुपकी वरचीही थोडीशी आहे. कांहीं दिवस धुमसत धुमसत एकदम मोठासा संग्राम झाल्या विषयीं तार येते. सध्यां पोर्टआर्थर हें लढाईचें मुख्य ठिकाण आहे. या संबंधानें बातम्या द्विविध आहेत. कोणी ह्मणतात कीं रशियांनें हें बंदर सोडून आपलें ठाणेंच उठविलें आहे. कोणी ह्मणतात कीं जपानानें भेरीला आणिल्यामुळें व तिन्ही बाजूंनीं एकसारखा वेढा पडल्यामुळें पोर्ट आर्थर जपानच्या ताब्यांत गेलें आहे. नुकतीच तेथें एक चकमक झडली, त्यांत जपानाची सरशी झाली. ही लढाई पुष्कळ वेळ चालेल आणि ती संथपणानें चालतांना शेवटीं दोन्ही राष्ट्रें खर्चानें रसातळास पोचण्याचा संभव आहे. दोघांची सरशी झाली तरी देखील दोघांचा मोठा ऱ्हास होईल; आणि जर एक विजयी व दुसरें पादाक्रांत असा प्रकार झाला तर ती पादाक्रांती ह्मणजे आशिया खंडांतलिच काय पण सर्व पृथ्वी वरील श्रेष्ठ राष्ट्रांची उलथा पालथ केल्या शिवाय राहणार नाहीं.

जपानच्या जयाकडे आमची मनोदेवता वाहते; आणि ती तिची शिघ्र गती लवकर अनुभवास परमेश्वर कृपेनें येवो असें आह्मी इच्छितों. गेल्या अंकीं जपान-फंडा संबंधानें जो लेख लिहिला होता त्याचा विचार आमची वाचक मंडळी जरूर करितील अशी आह्मांस बळकट आशा आहे. ही आशा सफळ होत जाईल ततशी वर्गणीची रकम चांगली मोठी होणार आहे.

## शुभ वार्ता

दुर्वार्ता क्वचितच खोट्या ठरतात पण त्या जेव्हां खोट्या ठरतात तेव्हां मोठा आनंद होतो. परंतु अशा दुर्वार्ता काबूलच्या अमिरासारख्या दूरवर्ती शहांत सांपडलेल्या मोहऱ्या संबंधानें ऐकिली व ती खोटी ठरली ह्मणजे मोठी मौज वाटते. काबूलच्या अमिरास विषप्रयोग करून ठार मारल्याची बातमी रशियाच्या पत्रामध्यें प्रथम तारेनें प्रसिद्ध झाली तेथून ती बातमी विलायतेला जाऊन इंडियांत आली. बातमी ऐकतांच नुकत्यांच राज्यारूढ झालेल्या अमिराबद्दल फार हळहळ वाटली. पण ही बातमी खुद्द काबूलाकडून प्रथम इंडियांत यावयास पाहिजे होती. तशी ती आली नाहीं हेंच ती बातमी अगदीं निराधार व खोटी असावी व रशियाच्या मनोभावनेशीं एखाद्या पत्रानें काल्पनिक विषप्रयोगाची गोष्ट जळविली असावी असा लागलीच तर्क झाला आणि कळविण्यास आनंद वाटतो कीं विषप्रयोगाची कथा लटकी आहे असे संदेश चोहोंकडून येऊं लागले आहेत. रशिया व इंग्रज यांच्या शहांत अमीर आहेत तोंपर्यंत काबूलच्या बाजूनें शांतता राहील असें आह्मी समजतों.

## कचेऱ्यांची वेळा

उन्हाळ्या निमित्त कचेऱ्यांची वेळा सकाळचे ८ पासून २ वाजेपर्यंत होणार होत्या परंतु या सहा घंट्यांचा काळ लोकांस फार गैरसोयीचा आहे, आणि त्याच प्रमाणें हाताखालील अधिकाऱ्यांस व कारकून मंडळीस या व्यवस्थेनें मोठाच त्रास पडणार आहे असें मेजर कोलेब यांच्या नजरेस राजश्री छे साहेब आदिकरून गृहस्थांनीं आणिलें तेव्हां डिपुटी कमिशनर साहेब बहादुरांनीं आपला पूर्वीचा हुकूम फिरविला असें कळतें. सकाळच्या कचेऱ्या करण्यापेक्षां हल्लींचीच कचेरीची वेळ सगळ्यांस अधिक सुखकर होते असें दिसल्या वरून नेहमींची चालू व्यवस्था ह्मणजे ११ चे घंट्या पासून ५ वाजे पर्यंतची कचेऱ्यांची मुकर वेळा कायम ठेवण्यांत येईल. आह्मी गेल्या अंकीं या बाबदींत सार्वजनिक गाऱ्हाणें मेजर साहेबांच्या कानावर घातलें होतें. आमच्या त्या लेखाचा डेपुटी साहेबांनीं इतका बहुमान

केला हें पाहून आम्ही त्यांचा गौरव करितो. ८ पासून २ पर्यंत कचेरी केल्यापासून लोकांस फार शीण होणार आहे ही गोष्ट साहेब बहादुरांच्या पूर्वीच लक्ष्यांत आली नसावी असें दिसतें आणि ह्मणूनच त्यांनीं तसा हुकूम फर्माविला॰ असावा. आतां लोकांची होणारी गैरसोय लक्ष्यांत घेऊन आणि ह्यांना खालील अधिकारी मंडळास व कारकून मंडळीस सुखविण्यासाठीं पूर्वीचा हुकूम फिरावली ही गोष्ट मेजर साहेबांच्या मत स्वातंत्र्याची व दातातुमहाची चांगली साक्ष देत आहे.

## रा. जठार यांचा बहुमान

हैद्राबाद येथील "यंग मेन्स इंप्रुव्हमेन्ट सोसायटी"च्या सुंदर शृंगारिलेल्या, दिवाणखान्यांत गेल्याचे मागील सोमवारीं ह्मणजे तारीख १४ मिनहू रोजीं सायंकाळीं ६ वाजतां, सदर संस्थेच्या सभासदांची व चंद्रघाटावरील इतर सभ्य लोकांची एक सभा भरली होती. या सभेचे त्या दिवशींचें मुख्य काम ह्मणजे हैद्राबादेस सुमारे दोन वर्षें रेसिडेन्सी बाजारच्या सुपरिंटेंडेंटचें काम फार हुषारीनें व न्यायानें केलेले सद्गृहस्थ रा. रा. काशीनाथ श्रीराम ऊर्फ बापूसाहेब जठार यांस, ते ४॥ महिन्यांचे रजेवर इकडे पुनः याच कामावर परत न येण्याचे तयारीनें गेले त्या वेळीं, त्यांचे सन्मानार्थ पानसुपारी करून सार्वजनिक रितीनें त्यांचा निरोप घेणें हें होय. रा. जठार हे इकडे फार लोकप्रिय झाले असून सरकारांतही त्यांची फार बोलबाला झाली आहे. अशा सदधिकाऱ्याचा शक्य तेवढा गौरव करण्यास ही संस्था उद्युक्त झाली ही गोष्ट या संस्थेच्या गुणग्राहकतेची साक्ष देते. गौरकाय अधिकारी कसेही असले तरी ज्या अर्थी सरकारांत त्यांची फार चहा होते त्या अर्थी लोकानांही त्यांचा गौरव करावा लागतो; व गौरव करण्यास लोक तयार असतातही. परंतु नेटिव–हिंदु–ब्राह्मण–असा अधिकारी असून त्यानें सरकारांतून इतका मान व जनतेकडून इतकी लोकप्रियता संपादन केल्याचीं उदाहरणें फारशीं आढळत नाहींत. एक संस्कृत कवी ह्मणतो:—

> नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके
> जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन ।
> इति महति विरोधे विद्यमाने समाने
> नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥

असो. सोमवारीं सकाळीं रा. जठार यांचे प्रीत्यर्थ सुमारें २९० गोरगरिबांस अन्नदान व द्रव्यदान करण्यांत आलें. सायंकाळीं दोन हिंदु देवळांतून व एका मशिदींतून त्यांचेच करिता ईश्वर प्रार्थना व उत्तम रोषनाई करण्यांत आली. सभेच्या कामास बरोबर ६ वाजतां सुरवात होऊन अध्यक्षस्थान रा. रा. रघुनाथ प्रसाद बक्षी, हैद्राबाद हायकोर्टचे जज्ज यांणीं मंडित केलें. जमलेल्या मंडळींत खालील गृहस्थ होते:–ले॰ कर्नल गिमुलेट. रेसीडेन्सी सर्जन, रा. पेस्तनजी दोसाभाई, रा. रामचंद्र लक्ष्मण, राजे हरिदास भगवानदास, शेट राम गोपाळ साहू, शिकंदराबाद, रा. गणेश बापूजी, रा. नारायण पांडुरंग जोशी, रा. कृष्ण अय्यंगार, रा. कृष्णमाचारी, रा. वर्धराज मुदलियार, डा. मह्मणा, एम्. बी. एम्. यस्. डी. पी. एच्. डा. किर्लोसकर, एल. एम्. एस्. इ. इ. अध्यक्षांनीं सभेच्या कामास सुरवात केल्यावर रा. केशवराव हायकोर्ट वकील यांनीं उर्दूत भाषण केलें. ते ह्मणाले:—

केवळ 'जठार' या नांवावरूनच रा. बापूसाहेब यांच्या कर्तव्यदक्षतेचा व संभावितपणाचा उत्तम बोध होण्यासारखा आहे. कै॰ वा॰ रा॰ ब॰ श्रीराम भिकाजी जठार यांचे प्रमाणेंच त्यांचे चिरंजीव रा॰ बापूसाहेब हेही सरकारचे विश्वासनिधी नौकर व जनतेचे खरे कल्याणकारी आहेत. वय फार नसतांही रा॰ बापुसाहेब हे आपल्या शहाणपणानें, दयाळूपणानें व सौजन्यानें प्रत्येक ठिकाणीं सरकारचें विश्वासस्थान व लोकांचें प्रेमपात्र होतात.

रा॰ केशवराव यांचें इतकें भाषण झाल्यावर रा॰ विष्णुपंत लेले यांनींही वरील आशयाचेंच पण इंग्रजींत भाषण केलें; व सदर संस्थेस रा॰ जठार यांजकडून वारंवार मिळत गेलेल्या अमूल्य साहाय्याबद्दल ही संस्था त्यांची फार ऋणी आहे रा॰ जठार यांची प्रकृती लवकर दुरुस्त होऊन ते पुनः येथेंच यावेत व त्यांचा आह्मांस आजवर मिळालेला सुसमागम पुनरपि मिळावा. अशी सर्व लोकांची ईश्वराजवळ नित्य प्रर्थना असल्याबद्दलही त्यांनीं सांगितलें.

रा. लेले यांचे नंतर अध्यक्ष रा॰ बक्षी यांनीं रा॰ बापू साहेब यांची उर्दू भार्षेत बरीच स्तुति करून तेथेंच टांगून ठेवलेला रा॰ जठार यांचा "ऑईल पेंटिंग" चा फोटो उघडा केला. हा फोटो चंद्रघाट येथील लोकांनीं सदर संस्थेस नजर केला आहे.

इतकें झाल्यावर रा॰ बापू साहेब यांनीं उत्तरा दाखल थोडेंसें पण अस्खलित भाषण केलें. ते ह्मणाले:—मला येथील लोकांकडून व या संस्थेकडून आज जितका मान मिळाला आहे तितका मिळेल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. तथापि आपण सर्वांनीं केलेल्या गौरवा बद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. व हा भागानगरवास ह्मणजे मी आपल्या आयुष्यांतील एक सुखाचा काल समजेन.

याप्रमाणें भाषणें झाल्यावर अध्यक्ष व रा. जठार यांस पुष्पहार घातले. जमलेल्या मंडळीस पानसुपारी व अत्तर गुलाब झाल्यावर एडवर्ड बादशहा, हुजूर निझाम सरकार सर डेविड बार रेसिडेंट, व रा॰ जठार या प्रत्येकांचे नांवें त्रिवार जयघोष होऊन सभा बरखास्त झाली.

रात्रीं "रेसिडेन्सी बाजार टेनिस क्लब मार्फत रा॰ जठार यांस थाटाची मेजवानी झाली. भोजनोत्तर गाणें बजावणें होऊन मध्यरात्रीचे सुमारास मंडळी आपापले घरीं गेली.

## होनरूरू सिव्हिल सर्व्हंट.

आपल्या वऱ्हाड प्रांतांत तीन तपें पर्यंत मोठ्या हुशारीनें प्रजासेवा व राजसेवा करून विश्रांती भोगण्यासाठीं गुदस्तसालीं पेनशन घेऊन रिटायर झालेले ए० अ० कमिशनर रा० रा० एदलजी जमशेटजी संजाना यांचे सर्वांत कनिष्ट पुत्र रा. रा. कैकोबाद एदलजी संजाना हे तारीख २४।३।१९०४ रोजीं फ्रेंच मेल स्टीमर "व्हिलेली सी ओटा" या आगबोटीनें इंडियन सिव्हिल सर्व्हिसचे परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं विलायतेस रवाना झाले आहेत हें कळविण्यास आह्मास आनंद वाटतो.

रा० रा० कैकोबाद यांनीं आपला प्रारंभापासून युनिव्हरसिटीचे प्रवेश परिक्षेपर्यंतचा सर्व अभ्यास उमरावती येथें करून ४ वर्षांमागें तेथील हायस्कूलांतून युनिव्हरसिटीची प्रवेश परीक्षा उच्च पदवीवर पास करून २० रुपये दरमहाची वऱ्हाडची ४ वर्षें मुदतीची स्कालरशिप मिळवून नेमलेल्या मुदतींत बी. ए. चा अभ्यास संपवून गेल्या नोव्हेंबर महिन्यांत सदर्हू परीक्षा पहिल्या वर्गांत पास करून इतिहास वगैरे विषयांत सर्व युनिव्हरसिटींत त्यांचा पहिला नंबर लागल्यामुळें त्यांस "टेलर प्राइझ" मिळालें होतें. व ह्याच कारणामुळें त्यास गेल्या जानेवारी पासून एल्फिन्स्टन कालेजांत सदर्हू विषय शिकविण्यासाठीं जुनिअर फेलो नेमण्यांत आलें होतें. रा० रा० कैकोबाद यांस हल्लीं २१ सावें वर्ष चालत असल्यामुळें त्यांस सन १९०५ व सन १९०६ या दोन्ही सालीं सिव्हिल सराव्हिसचे परीक्षेंत बसण्याची सवड आहे. ईश्वर त्यास सुयश देवो.

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | १०० |
| सोनें २४।= | | चांदी ७१। |
| ज्वारी ९०–९२ | | जवस ७९ |
| गहू काठे ८० | | बनशी ९० |
| सरकी | | ९॥ |
| मीठ | ३॥ | रु. मण |
| चणे | २॥ ते ३ | रु. मण |
| तूप | ८॥ | रु. मण |
| तेल | ४॥ | रु. मण |
| रुई जीन | | ८३ |
| कापूस | | ९७ |

## वऱ्हाडवृत्त.

ज्या अपराधांस देहांत शिक्षा नाहीं अशा सर्व अपराधांची चौकशी करण्याचे माजिस्ट्रेटीचे संपूर्ण अधिकार वऱ्हाडांतील सर्व डेपुटी कमिशनरांस देण्यांत आले आहेत हे अधिकार कायमच्या व तसेच आफिशिएटिंग डेपुटी कमिशनरांसाहि दिले आहेत. इतके दिवस अधिकाऱ्यांच्या नांवानें हे अधिकार वेळोवेळ देण्याचा परिपाठ असे पण ते हल्लींच्या हुकुमानें डेपुटी कमिशनरीच्या हुद्याला जोडल्यामुळें यापुढें नांवनिशीवार अधिकार देण्याची जरूर पडणार नाहीं.

रा. रा. रंगनाथ विष्णु डोंगरे ए. अ. क. आणि माजिस्ट्रेट वर्ग १ ला यांस समरी माजिस्ट्रेटीचे अधिकार देण्यांत आले.

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. यांस स्पेशल ड्युटीवर नेमिल्या कारणानें रा. रा. जी. सुब्रायडू नायडू ए. अ. क. यांची बदली वाशिमाहून यवतमाळास करण्यांत आली.

कै० रा. रा. विठ्ठल नारायण काळीकर यांच्या रिकाम्या तहशिलदारी संबंधानें खालील प्रमाणें बढत्या देण्यांत आल्या:—

| रा. रा. | तहशिलदारीची बढती |
|---|---|
| खान बहादूर शेरमहमदखान | २ रा वर्ग |
| पांडुरंग वासुदेव भगत | ३ रा ,, |
| सय्यद फरुख हुसेन | ४ था ,, |

## नोटीस

वेशमी–जानकी मर्द नथू राऊत राहणार तेल्हार हीस:—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तूं माझी मोहतराची बायको आहेस. तूं दिपवाळीला ह्मणून बापाच्या घरीं गेलीस पण अजून गेल्या दीड वर्षांत परत येत नाहींस. दोन चार वेळां नेण्यास आलो तर कांहीं तरी उडवाउडवीचे जबाब बापाच्या सल्यानें देतेस; आणि मला संशय येतो कीं तुझ्या अंगावर घातलेलें डागीनें व वस्त्रप्रावरण मिळून अजमासे रुपये ६०० श्याचे हीं तुझ्या आईबापांच्या मनांतून लुबाडून घ्यावयाचीं आहेत. तूं ज्या करारनाम्याच्या शर्ती पुढें करितेस त्या चुकीच्या आहेत. करारनाम्याप्रमाणें माझें वर्तन बरोबर आहे. तुझ्या ह्मणण्या प्रमाणें मी पहिली बायको सोडली व दागिन्यांच्या लालचीनें तुझा बाप तुलाही धाडूं इच्छित नाहीं असें मला वाटतें तूं ही नोटीस पोचल्या तारखे पासून ८ दिवसांच्या आंत दागदागिन्यासुद्धां माझ्या घरीं येऊन प्रपंच करण्यास लागावें. असें करण्यास चुकलीस तर कोर्ट मार्फत तुझा दागिन्यासुद्धां दावा केला जाईल आणि तुझ्या बापावरही फिर्याद करून त्याच्या विरुद्धही योग्य ती दाद मागण्यांत येईल. कळावें. ता. २६ मार्च १९०४ इ.

सही.
नथू वा. रामजी राऊत
राहणार चिखलगांव ता.
आकोला दरतुर खुद्द

## नोटीस.

रा० रा० विठ्ठल रंगराव जहागिरदार राहणार बाभूळगांव जहागीर तालुका अकोला यांस.

खालीं सही करणार यांजकडून तारीख १७ सप्तेंबर १९०३ च्या छापील नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं बाभुळगांव येथील सर्व्हे नंबर ६८ व ८७ हीं दोन शेतें जहागिरीच्या पूर्वी पासून कदीमची आमच्या वहिवाटींत आहेत. तुमची नोटीस बेकायदा व चुकीची आहे. सरकारी सारा व पट्टी या शिवाय अधीक रक्कम मागण्याचा तुह्माला अधिकार नाहीं. आणि या प्रश्नाचा निकाल तुह्माआह्मामध्यें हायकोर्ट अपील नंबर १६ सन १९०३ च्या प्रकरणांत २३ मार्च १९०३ रोजीं झालेला आहे. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. या संबंधानें पूर्वीच नोटीस समज तुह्मांस आह्मी दिली आहे. कळावें तारीख २७ मार्च १९०४ इ०

सहीची निशाणी.
दत्ताजी रामचंद्र पाटील
यांचे हातची रेघ—

## स्त्रियांचें प्राबल्य

ल्हासा येथील एकंदर लोकवस्तींत स्त्रियांचाच भरणा विशेष आहे. सर्व तिबेट देशांत स्त्रियांच्या संख्येचें प्रमाण अधिकच आहे. ल्हासा येथील पेठेंतील दुकानांतून कारकुनांचीं वगैरे कामें सुद्धां स्त्रियाच करितात! तेथें असा कोणताही धंदा नाहीं कीं त्यांत स्त्रिया कामें करीत नाहींत! तेथील हिंदू लोक अत्यर्थव्रतच या स्त्रियांच्या प्राबल्यास कारण असावें असें ह्मणतात! अनेक स्त्रियांशीं एकाच पुरुषानें विवाह करण्याची व तसेंच अनेक पुरुषांशीं एकाच स्त्रीनें विवाह करण्याची चाल या देशांत आहे! इतकेंच नव्हे तर अनेक भावांचें एकाच स्त्रीशीं लग्न व तसेंच अनेक बहिणींचें एकाच पुरुषाशीं लग्न हे संबंध तिकडे विशेष संमत मानले जातात.

**बोधपर आख्यायिका**—– ताजमहालाचा पाया खणण्या पूर्वी शहाजान बादशहानें सदर इमारतीवर भारी रत्नजडित काम करणाऱ्या कारागिरांस एके ठिकाणीं जमवून आंचे देखत मोहरांच्या मेहुण्यांच्या थैल्या यमुना नदींत टाकून दिल्या हें पाहून त्यांतील कांहींकांस अचंबा वाटला व त्याप्रमाणें त्यांनीं उद्गारही काढिले. हें पहाण्या बरोबर या आश्चर्यचकितास बादशहानें एकदम रजा दिली व ह्मणाला “ जितक्या मोहरांचा एवढा लोभ वाटतो त्यांचे हातांत हिरेमाणकें कोणी द्यावींं?” मनुष्याची पारख करण्याची थोर लोकांची रीत कांहीं चमत्कारिकच असते.

**सरकारचें सर्व गुपित केव्हांच फुटलें**—हल्लींचें हिंदुस्थानातील सरकार हिंदुस्थानासाठीं काय काय करणार आहे, याची सामान्य दिशा स्थूल मानानें लोकांना केव्हांच कळून चुकलेली आहे. इंग्लिश लोक येथील कर युक्ती युक्तीनें जास्त वाढविणार, जमिनीवरील कराचा बहुतेक वसूल झाल्यानंतर दुष्काळानें किंवा टोळधाडीनें बुडालेल्या शेतकऱ्यांना सूट देण्याविषयीं ठराव प्रसिद्ध करणार, येथील व्यापार आणि उद्योगधंदे बुडविण्यासाठीं फ्री ट्रेडच्या नांवाखालीं शक्य तेवढे सर्व प्रयत्न करणार, येथील शिक्षण वाढविण्याचें मिष दाखवून तें सरशील कमी करणार, आणि येथील पैसा जाईल इतका विलायतेस दवडणार, सारांश, फारसें उघडकीस न येतां हिंदुस्थानातील लोकांच्या डोक्यावरून सर्वतोपरी हात फिरवणार, ही इंग्लिशांच्या सर्व राज्यकारभारांतील मुख्य गुप्त गोष्ट होय. व ही गुप्त गोष्ट ज्याला समजली नाहीं, असा हिंदुस्थानांत आतां एकही मनुष्य उरला नसेल. काळ.

**चमत्कारः**—– घसोलीहून कांहीं लोक जगद्गुरु या दर्शनास जात असतां वाटेंत एक बाई त्यांनीं झाडाच्या फांद्यावर निचेष्टित पडलेली पाहिली. ती बाई तेथें दोन दिवस पडली होती. तिच्या अंगात आज २–२॥ वर्षें येतें व तसें झालें ह्मणजे असा चमत्कार घडून येतो असें ह्मणतात.

**रशियाचा इंग्लंडबद्दल द्वेष**– रशियाचा इंग्लंड विरुद्ध द्वेष तर पराकाष्ठेचाच आहे. एका रशियन वर्तमानपत्रानें असे स्पष्ट उद्गार काढलेले आहेत कीं हल्लींच्या लढाईत आपण जे लढत आहों ते जपानपाशीं लढत नाहीं. जपान हें रशियाच्या द्वेषाला पात्र नाहीं व रशियन रक्त लुटीं घालण्याइतकी जपानाची योग्यताही नाहीं. खरा आपला इंग्लंडशीं सामना आहे, आणि ह्मणून रशियन लोकांनीं आपला सगळा द्वेष आणि शत्रूच्या रक्ताकरितां तृषार्त झालेल्या रशियन स्वाभिमानाचा सगळा वेग इंग्लंडच्याविरुद्धच उपयोगांत आणला पाहिजे.

**हुताशनी महोत्सवाचा फायदा**–“फाल्गुन वद्य द्वितीयेस देशाधिपतीनें अथवा ग्रामाधिपतीनें छत्र वगैरे लावून सुशोभित केलेल्या रम्य जागीं बसून गांवातील व देशांतील लोकांच्या अंगावर गुलाल वगैरे उधळावा आणि त्यांना तांबूल वगैरे देऊन नृत्य, गीत व विनोद यांच्या योगानें त्यांच्या सहवर्तमान महोत्सव करावा.” असें धर्मसिंधूंत सांगितलें आहे व ह्याचाच अनुसरून वद्यपंचमीपर्यंत त्यांत वर्णिल्याप्रमाणें महोत्सव करण्याचा पुष्कळ ठिकाणीं प्रघात आहे.

ज्यांचा स्पर्श परस्पर निषिद्ध मानिला जात नाहीं अशा भिन्न भिन्न जातींतील लोकांनीं लोटपाट, हुतूतू, खो खो, टेंडूदांडू, हरणपिटी इत्यादि खेळ खेळणें, पोहणें, कुस्त्या वगैरे करणें, एकमेकांच्या अंगावर गुलाल टाकणें, रंग उडविणें, वाजत गाजत आनंदानें एकत्र फिरणें व गायनादि मनोरंजक कृत्यांत सर्वांनीं मिळून कांहीं वेळ घालविणें, हीं कृत्यें परस्परांमध्यें स्नेहभाव उत्पन्न होण्यास अथवा असलेला दृढ होण्यास फार आवश्यक आहेत.

## जपानी लोकाचें स्वदेशावरील प्रेम–

जपानी स्त्रियांप्रमाणें जपानी पुरुषही मोठे उदार मनाचे व उत्साही आहेत. सर्व जपानी श्रीमंत उमराव लोकांनीं आपल्या घरांत सांठविलेले सोनेंनाणें, लढाईच्या उपयोगाकरितां कोणी मागितल्याशिवाय स्वतःच्या खर्चानें सरकारी तिजोरींत नेऊन भरलें आहे. शाबास! हेंच खरें राष्ट्रीय प्रेम!

## कांहीं इंग्रेज मुसलमान झाले

ख्रिस्ती लोक आमच्या देशांत येऊन येथील लोकांना ख्रिस्तीच्या कळपांत ओढण्याचा यत्न करीत आहेत. तों तिकडे इंग्लंडांत ख्रिस्ती लोक महमदचा आश्रय करीत आहेत. हें पाहून फार आश्चर्य वाटतें. इंग्लंडांत नुकतेंच १०० लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारिला या मंडळींत कांहीं डाक्टर, वकील, सालीसिटर, व बारिस्टर वगैरे चांगले सुशिक्षित लोक आहेत त्यांत एक मिशनरीही आहे असें समजतें. ख्रिस्ती लोक आपल्या धर्माला कंटाळले काय!

## स्वदेशासाठीं एका जपानी स्त्रीचें

साहस– नागासकी येथें यंडोयोशी नांवाची एक जपानी कुमारिका होती. ती पांच वर्षांपूर्वीं हरबीन शहरीं गेली व तेथें एक रशियन सेनापतीशीं तिनें लग्न करून घेतलें. पुढें होणाऱ्या जपान व रशिया मधील युद्धाची गुणगुण हिच्या कानावर गेली होती. अर्थात आपल्या देशाला उपयोगी पडण्याची तिची इच्छा होती. तिचा नवरा एका नकाशाचा फार लक्ष लावून अभ्यास करीत असे. या नकाशावर त्या बाईचें लक्ष गेलें. लवकरच तिला असें कळून आलें कीं, तो नकाशा मांचूरियचा होता. व त्यांत नागोजाग असलेले किल्ले व तटबंदीच्या जागा तसेंच जरा नवा हल्ला आल्यास त्याचा प्रतिकार करण्याकरितां तयार केलेल्या मचाणांच्या जागा यांचें सविस्तर वर्णन होतें. असें कळतांच तिला असें वाटलें कीं, जर हा नकाशा आपल्या हातीं लागला तर आपल्या देशाला रशियाचे विरुद्ध लढाई करण्याचे कामीं अत्यंत उपयोगी पडेल. हा नकाशा हस्तगत होण्याची ती कित्येक दिवस वाट पहात होती. व तिला संधी मिळतांच एके दिवशीं तो सेनापती घरीं नाहीं असें पाहून ती तो नकाशा घेऊन पळाली ती पेकिंग येथें आली व तेथें जपानी वकीलातीत जाऊन तिनें जपानी लोकांशीं मदत मागितली व नकाशा त्यांचे स्वाधीन केला. पेकिंगचे जपानी लोकांनीं तिला नागासाकी येथें सुरक्षित पोंचती केली. व तेथें ती हल्लीं अद्याप सुरक्षित आहे. सदरचा नकाशा अत्यंत महत्वाचा असून जपानी लष्कराला त्याचा फार उपयोग होत आहे असें ह्मणतात.

## पक्ष्यांचा नियमितपणा

पक्षीवर्ग निसर्गतःच फार नियमित व आपल्या कामांत फार तत्पर असतो. त्यांचा कार्यक्रम इतका पद्धतवार होत असतो कीं, पक्षी काय करीत आहे हें पाहून बिनचूक घड्याळ लावितां येतें. मैना, राघू, चिमणी, कोकिळा, भारद्वाज, काक इत्यादि पक्षी आपल्या नेहमींच्याच परिचयांतले आहेत. त्यांच्या नियमितपणाचा अनुभव पाहणें असल्यास आपण नेम करावा कीं कांहीं तरी खाद्य त्यांच्या पुढें नियमीं ठरीव वेळेवर मांडावें. म्हणजे आढळून येईल कीं ते पक्षी त्या ठरीव मुहूर्ताला अचूक येऊन आपला दाणाचारा घेतात. आणि कांहींशा परिचयानें तर ते इतके माळसळतात कीं, ते माणसाच्या हाताशीं झोंबाझोंबी करूं लागतात. हाच नियमितपणा त्यांच्या इतर कार्यांतही दृष्टीस पडतो. पक्ष्यांचा नियमितपणा माणसाला येईल तर किती चांगली गोष्ट होईल. कोंबडा नियमितवेळीं आरवतो ही तर नियमाच्या पाठांतलींच मोठ आहे.

**मुंग्यांची शस्त्रक्रिया**—ब्रेझिलमध्यें शस्त्रवैद्य मुंग्यांचा उपयोग फार नामी करितात. एखाद्या मनुष्याला जखम झाली तर दुभंगलेली त्याची कातडी जोडण्यासाठीं वैद्य हा त्या कातडीचीं दोन्ही तोंडें जवळ जवळ आणतो आणि तेथें दोन्ह्यांचा टाका घालण्या प्रमाणें मुंग्या चिकटवून देतो. ह्मणजे प्रत्येक मुंगी आपल्या पुढील नांग्यांनीं ती तुटलेली कातडी धरून ठेविते आणि अशा रीतीनें जखम भरून येई पर्यंत दोन तीन दिवस मुंग्या तशाच राहूं देतात. असा हा मुंग्यांचा चमत्कारिक उपयोग करण्याचा परिपाठ तिकडे फार जुना आहे असें सांगतात.

**हत्तीचें प्रेम कौशल्य**– बुद्धि, चातुर्य व प्रेम इत्यादि गोष्टींत हत्ती हा जवळ जवळ माणसाचीच बरोबरी करितो. किंबहुना लहान मुलांचें संगोपन सुद्धां मायाळू दायाप्रमाणें हत्ती करितो असा अनुभव आला आहे. सियामांत बायका आपलीं पोरें हत्तीजवळ खेळण्यासाठीं सोडून देतात आणि तीं मुलें हत्तीच्या पायाला धरून व सोंडेला लोंबकळून मनसोक्त खेळतात आणि एवढा प्रचंड हत्तीही त्या मुलांना मोठ्या लडिवाळपणानें खेळवितो.

## रक्तानें पत्रें लिहिलीं

पोर्ट आर्थरचें आगबोटी नेऊन तें बंदर कोंडून टाकण्याकरतां कांहीं स्वयंसेवक पाहिजे होते. त्याकरितां २००० अंमलदार व इतर लोक तयार झाले आहेत आह्मास ह्या कामगिरीवर धाडा ह्मणून कित्येकांनीं आपल्या रक्तानें पत्रें लिहिलीं आहेत.

## देशाभिमानी राजपुत्र

गोर्डनर्ड्याच्या प्रिन्स आलेक्झांडरनें युद्धाच्या फंडाला १,९०,००० पौंड दिल्यामुळें देशाभिमानाचें वारें जिकडे तिकडे वाहत आहे. त्यांनीं आरण चरिऑट व कार्लेको यांनीं अतिशय शूर लोकांची एक पलटण तयार करतों असें ह्मारला वचन दिलें आहे. युद्ध संपेपर्यंत अशा कटक लोकांचा खर्च आपण देऊं असें त्यांनीं अभिवचन दिलें आहे.

## लढाईचा कृत निश्चय

टोकिओहून रूटर तारेनें कळवितो कीं जपानी पार्लमेंट उघडण्याचे वेळीं बादशहा ह्मणाले कीं, रशियाशीं सरकारनें बरीच वाटाघाट केली. परंतु रशियाच्या शांतिविषयीच्या भाषणांत कांहीं खरेपण नसल्यामुळें आह्मांस लढाई सुरूं करणें प्राप्त झालें; व युद्धाचा उद्देश सफळ झाल्याशिवाय अतां मागें घेतां येत नाहीं.

## देशी भाषेवर लक्ष

मुलाला देशी भाषा चांगली येऊं लागल्या वांचून त्यास इंग्रजी शिकविण्यास आरंभ करूं नये; व इंग्रजी शिकविण्याची सुरवात केल्यावर देखील बराच काळपर्यंत तिच्या द्वारें दुसरें विषय शिकवूं नयेत, ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यानें देशी भाषा कोपऱ्यांत पडतात, व वेडेंविद्रें उत्तेजन मिळतें. विद्यार्थ्यांचा शाळेंतील अभ्यासक्रम संपेपर्यंत त्यांचा देशी भाषेचा अभ्यास चालूंच ठेवावा. जर शिकलेले लोक देशी भाषांचें हयगय करतील तर त्या नुसत्या संभाषणाच्या भाषा ह्मणून राहतील व युरोपियन ज्ञान देशी भाषांच्या द्वारें यावें ह्मणून १८५४ च्या ठरावांतील तत्व तसेंच राहील.

## शेतकी कॉलेज

नागपूर येथें एक देशी पद्धतीनें शेतकी शिकविण्याची वर्ग आहे. शेतकी शिक्षणाची एवढी आवश्यकता असतां त्या प्रकारचें पूर्ण शिक्षण देणारी हिंदुस्थानात एकही संस्था नाहीं. आहेत त्या शाळा व वर्गांनें. यांचे फारसें यश आलेलें दिसत नाहीं. इंग्रजींत ज्यांनीं त्या विषयाचें चांगलें अध्ययन केलें आहे अशा लोकांनीं देशी भाषांत पुस्तकें लिहिलीं पाहिजेत. हिंदुस्थान सरकारचा, एक सर्व देशाकरितां म्हणून शेतकी कॉलेज स्थापण्याचा विचार आहे.